अहवाल क्रमांक : १५०

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

(पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील पहिल्या अहवालातील गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल)

# पहिला अनुपालन अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल दिनांक डिसेंबर, २०१७ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१७

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

# पहिला अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील पहिल्या अहवालातील गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल)

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री.रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ.देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ.सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री.सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री.किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री.राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री.तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री.भारत भालके , वि.स.स.
१७. प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. श्री.तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री.ह.वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख :**

१. *श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री.अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री.रमेश बुंदिले, वि.स.स.
११. श्री.अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. श्री.के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री.अमित झनक, वि.स.स.
१८. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
२२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(४) श्री.ह.वि. तामोरे, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिति
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री.अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री.अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. श्री.के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री.अमित झनक, वि.स.स.
१८. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. ना.रा.थिटे, उप सचिव
(४) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

## पंचायती राज समिती
## (सन २०१३-२०१४)

**समिती प्रमुख :**

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७. श्री.दिलीप माने, वि.स.स.
८. श्री.भारत भालके, वि.स.स.
९. श्री.बाबासाहेब पाटील, वि.स.स.
१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
११. डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.
१३. श्री.संजय भेगडे, वि.स.स.
१४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
१५. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१६. श्री.संजय राठोड, वि.स.स.
१७. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१८. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
१९. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
२०. श्री.राजाराम ओझरे, वि.स.स
२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
२३. श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित :**

२६. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
२७. श्री.सुरेश हळवणकर, वि.स.स.
२८. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव
(४) श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा “ समिती प्रमुख ” या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन तेराव्या विधानसभेतील समितीच्या पहिल्या अहवालातील गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालासंबंधीच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधी पहिला अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ करिता समिती दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येय धोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला “ Mini Legislature ” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात, त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो, परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात

आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे देखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तींवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासन खाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा ऊहापोह केला आहे.

सन २०१५-१६ करिता [गठीत] करण्यात आलेल्या समितीचा पहिला व दुसरा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांस दिनांक  २९ जुलै, २०१५ रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्टांमध्ये समावेश केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या संदर्भात दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या संदर्भात दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही विचारात घेतल्यानंतर समितीच्या अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी डॉ. विजय सतबीर सिंह, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, (व्यय) वित्त विभाग, श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग, श्री. संजीव कुमार, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. वि. रा.नाईक, सचिव, ग्रामविकास विभाग (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना), डॉ. एस. के. बागडे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा, श्री. वि. ज. सुरळकर, संचालक, विमा संचालनालय, डॉ. सी. एल. पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया, श्री. शेखर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, श्री.व्ही.व्ही.गुजर, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. भा. र. गावित, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती शुभांगी शेठ, सह सचिव, वित्त विभाग, श्री.श.मा.साठे, उप सचिव, कृषी व पदुम (पदुम) विभाग, श्री. ला. रा.गुजर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, श्रीमती.स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. भि. य. मंता, उप सचिव, उर्जा विभाग, श्री. प्रकाश इंगोले, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या कामकाजात दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक १९ डिसेंबर, २०१७.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| | | **प्रकरण एक** | | |
| | | **जिल्हा परिषद, गोंदिया** | | |
| | | **(सन २००८-२००९)** | | |
| (१) | एक | खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्याबाबत. | ३.११२ | १ |
| | दोन | अनुसूचित जाती / नवबौध्द लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर शेळ्यांचे गट वाटपाबाबत. | ३.७५८ | ७ |
| | तीन | ६ महिने ते १ वर्ष तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांना पौष्टिक आहार म्हणून नाचणी, खीर पुरविण्याबाबत/ पूरक पोषण आहार पुरवठ्याबाबत. | ३.९८६/ ३.९८७ | १० |
| | | **(सन २००९-२०१०)** | | |
| | चार | सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी. | ३.१०३६ | १५ |
| | | **प्रकरण दोन** | | |
| | | **जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग** | | |
| | | **(सन २००८-२००९)** | | |
| (२) | पाच | मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविण्यासाठी अर्थसहाय्य. | ३.७८६ | २१ |
| | | **(सन २००९-२०१०)** | | |
| | सहा | विमा व रॉयल्टीची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसुल न केल्याबाबत व बांधकामाच्या इतर अनियमिततेबाबत. | ३.१४७ | २७ |
| | सात | नेरुर कार्यात नारुर रस्ता डांबरीकरण तथा नुतनीकरण. | ३.१४८ | ३४ |
| | | **परिशिष्ट " अ "** | | |
| | | शासनाचे आदेश व परिपत्रक | | ४१ |
| | | **परिशिष्ट " ब "** | | |
| | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | ७९ |

## प्रकरण एक

# जिल्हा परिषद, गोंदिया

### खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्याबाबत (परिच्छेद क्र. ३.११२)

पंचायत समिती, गोरेगांव अंतर्गत एकूण १९२ शिक्षक व परिचरांनी रजा प्रवास सवलत उपभोगल्याने त्यांना रुपये ९,८८,२४२/- चे प्रदान केलेले आहे. याबाबत सन २००८-२००९ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील मूळ आक्षेप खालीलप्रमाणे होते.

(१) गोंदिया ते कोल्हापूर रेल्वे प्रवास द्वितीय श्रेणी आरक्षित तिकिटाचे दर रु.३९०/- असतांना रु.४७० नमूद केलेले आहेत. तसेच कोल्हापूर ते वेंगूर्ला अंतर १५० किलोमीटर असताना ३४० किलोमीटर दर्शवून व बसभाडे प्रत्यक्षात रु.९५/- असतांना रु.२३०/- दर्शविल्याने संबंधितांनी प्रत्यक्ष प्रवास न करता खोटी देयके सादर करून शासनाचे रु.९,८८,२४२/- चे नुकसान केलेले आहे.

(२) प्रत्यक्षात प्रवास केलेल्या कर्मचाऱ्यांनी आपली प्रवास देयके स्वतः सादर करणे, अभिप्रेत असतांना रजा प्रवास देयके जवळपास एकाच हस्ताक्षरात तयार केल्याचे आढळून येते.

(३) उपरोक्त बाबीवरुन आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी देयके तपासल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे शासन नुकसानीची रक्कम रु.९,८८,२४२/- वसूल होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांसंदर्भात जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला होता.

सन २००८-०९ पंचायत समिती, गोरेगांव अंतर्गत एकूण १९२ शिक्षक व परिचरांनी रजा सवलत उपभोगले असता,

(१) लेखा परिक्षणात नमूद केलेली अतिप्रदानाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा केलेली आहे.

(२) देयक संबंधित कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरीचे आहे.

(३) उपरोक्त बाबी लेखा परिक्षण करताना निदर्शनास आल्यावर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षक व परिचर यांचेकडून अतिप्रदान झालेले रु.१,३६,०९५/- रेल्वे तिकिट दर व बसभाडे वसूल केले आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०७ जानेवारी, २०१४ रोजी साक्ष घेतली. सदरहू साक्षीत प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी १९२ शिक्षक व परिचारकांविरूध्द सदरची देयके पारित करणाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली, संबंधित सर्व शिक्षक, गटविकास अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी व इतर यांची एक वेतनवाढ रोखणे व त्यांच्याकडून देयकाची रक्कम वसूल करण्याबाबत काय कारवाई करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीने दिनांक २५ जून, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी विधानमंडळाच्या उभय सभागृहास आपला पहिला व दुसरा अहवाल सादर केला. सदर अहवालात समितीने पुढील प्रमाणे अभिप्राय व शिफारशी शासनास केल्या :-

" पंचायत समिती गोरेगांव अंतर्गत एकूण १९२ शिक्षक व परिचरांनी रजा प्रवास सवलत योजनेंतर्गत गोंदिया ते कोल्हापूर असा द्वितीय श्रेणीचा प्रवास करताना गोंदिया ते कोल्हापूर द्वितीय श्रेणीचे भाडे रुपये ३९०/- असताना रुपये ४७०/- दर्शविले, बस भाडे प्रत्यक्षात रु.९५/- असताना रुपये २३०/- दर्शविले. तसेच कोल्हापूर ते वेंगुर्ले हे अंतर प्रत्यक्षात १५० कि.मी. असताना ते ३४० कि.मी. दर्शवून तसेच प्रत्यक्ष प्रवास न करता खोटी देयके सादर करून जिल्हा परिषदेकडून रुपये ९,८८,२४२/- एवढ्या प्रवास न केलेल्या रकमेची देयके सादर करून शासकीय रकमेचा अपहार केला होता.

सदर बाब लेखा परिक्षणाच्या वेळी निदर्शनास आल्यानंतर झालेल्या अतिप्रदानापैकी फक्त रु.१,३६,०९५/- एवढ्या रकमेची वसुली करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्यास जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही शहानिशा न करता मंजुरी दिल्याचे स्पष्ट होत होते.

सदर बाब सन २००८-०९ मध्ये उघडकीस येवून देखील सन २०१४ म्हणजे या विषयी समितीपुढे सचिवांची साक्ष होईपर्यंत ५ वर्षात या प्रकरणी संबंधितांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून समिती याबाबत खेद व्यक्त करते. सदर प्रकरणी संबंधित १९२ दोषी कर्मचारी तसेच त्यांची देयके मंजूर करण्यात सहभागी असणारे लेखाधिकारी, गटविकास अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी. अपहारित रक्कम सर्व संबंधितांच्या वेतनामधून तात्काळ वसूल करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत अवगत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

तसेच विदर्भातील शासकीय कर्मचारी कोकणात मुंबई येथे तसेच मुंबईतील शासकीय कर्मचारी विदर्भातील गडचिरोली येथे गेल्याचे दर्शवून न केलेल्या प्रवासाची प्रवास देयके सादर करून रजा प्रवास सवलत योजनेचा अवास्तव व अवाजवी फायदा घेतात असे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाने या बाबींवर आळा घालण्यासाठी प्रचलित धोरणात बदल करून ज्या ठिकाणी कर्मचारी काम करतात; तेथील आस्थापनेकडून त्या कर्मचाऱ्यांची त्यांनी सादर केलेली प्रवास देयके तपासण्यात व त्यांची शहानिशा करण्यात अमूल्य वेळ व पैसा वाया जात असल्यामुळे त्यात कर्मचाऱ्यांचाही वेळ जात असल्याने रजा प्रवास सवलतीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतन श्रेणीनुसार निश्चित स्वरुपाची एक रकमी रक्कम प्रदान करावी. जेणेकरुन राज्य शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने अवास्तव, अवाजवी व न केलेल्या प्रवासाची देयके शासनास सादर केल्यानंतर त्यांची शहानिशा करण्यासाठी शासनाचा वेळ व पैसा वाया जाणार नाही. अशा प्रकारचा परिपूर्ण तसेच सर्वसमावेशक शासन निर्णय काढण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करावी अशीही समिती शिफारस करीत आहे. ”

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, गोंदिया यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

खोटी रजा प्रवास देयक सादर करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी १९२ शिक्षकेत्तर कर्मचारी असून त्यापैकी एका शिक्षकाचे नाव दोन वेळा आल्यामुळे उर्वरित १९१ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असून कार्यालयाचे आदेश क्र.१२८०, दिनांक १७.०६.२०१४ अन्वये त्यांची एक वेतनवाढ तात्पुरती स्वरुपाची बंद करण्यात आलेली आहे. तसेच ज्यांनी ही देयके पारित केलेली आहेत; १. श्री. पी.जी.इळपाते, कनिष्ठ सहाय्यक, २. श्री.पी.जी.फुलझेले, कनिष्ठ सहाय्यक, ३.श्री.जी.सी. बिरनवार, कनिष्ठ सहाय्यक यांची एक वेतनवाढ कायम स्वरुपाची बंद केलेली आहे तसेच तत्कालिन गटविकास अधिकारी, श्री.बी.एन.मडावी यांचेवर कार्यवाही करण्यासाठी शासनास कळविण्यात आलेले आहे. तसेच खोटी रजा प्रवास सवलत सादर करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी १९१ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून आजपावेतो रु.७,५४,९९९/- रक्कम वसूल करून शासनखाती जमा करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रुपये २,३३,४४३/- शिल्लक असून काही शिक्षक
स ा ` ट ा ा ि न ा ट ा ृ त ा
झालेले आहेत व काही शिक्षक मृत पावल्याने वसुली बाकी आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

**वित्त विभागाचे अभिप्राय :-**

या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, रजा प्रवास सवलतीच्या अनुषंगाने वित्त विभागामार्फत सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर वित्त विभागाच्या क्रमांक रप्रस-१११४/प्र.क्र.११/सेवा-५, दिनांक १०.६.२०१५ रोजीच्या शासन निर्णयात परिच्छेद ११ खालील टिप क्रमांक ६ मध्ये नमूद करण्यात आले की “ रजा प्रवास सवलत उपभोगल्यानंतर प्रवास खर्चाचे देयकासोबत रेल्वे/बसची तिकिटे सादर करणे बंधनकारक राहील ”, तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १३ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, “ रजा प्रवास सवलतीचा लाभ घेणाऱ्या व त्यांना सदर सवलत मंजूर करणाऱ्या अनुक्रमे कर्मचारी/अधिकारी यांचेकडून संगनमताने खोटी देयके सादर करून, मंजूर करून घेतल्याचे आढळल्यास, कडक शिक्षेस पात्र राहतील. ” सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद, गोंदिया यांच्या स्तरावर संबंधितांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात आलेली आहे. श्री.बी.एन.मडावी, गटविकास अधिकारी यांचे विरुध्दची विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत पहिला अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. पंचायत समिती, गोरेगांव अंतर्गत एकूण १९२ शिक्षक व परिचरांनी रजा प्रवास सवलत योजनेअंतर्गत प्रवास न करता खोटी देयके सादर करून जिल्हा परिषदेकडून रुपये ९,८८,२४२/- एवढ्या प्रवास न केलेल्या रक्कमेची देयके सादर करून शासकीय रक्कमेचा अपहार केल्याचा आक्षेप लेखा परिक्षणात घेण्यात आला आहे. याबाबत जिल्हा परिषद, गोंदिया व वित्त विभागाने आपले लेखी अभिप्राय सादर केले आहेत. सदरहू लेखी खुलाशाव्यतिरिक्त विभागाला काही अतिरिक्त माहिती समितीला द्यावयाची आहे का अशी समितीने विचारणा केल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीला विदित केले की, या प्रकरणी एकूण १९१ शिक्षक/परिचरांकडून वसुली करणे अपेक्षित होते. त्यापैकी १३६ शिक्षक/परिचरांकडून १०० टक्के वसुलीची कार्यवाही पूर्ण झाली आहे. एकूण ३३ शिक्षक/ परिचरांकडील वसुली प्रलंबित असून त्यामधील ९ शिक्षक/परिचर सेवानिवृत्त झाले आहेत. ४ शिक्षक/परिचर मृत पावले आहेत. १ शिक्षक/परिचर निलंबित आहे आणि उर्वरित सर्व अन्य जिल्ह्यात बदलून गेले आहेत. या सर्वांकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. आता पर्यंत वसूल करण्यात आलेली रक्कम रुपये ७,५४,९९९/- शासन खाती जमा करण्यात आली आहे. उर्वरित ३३ प्रकरणातील एकूण रुपये २,३३,४४३/- अद्याप वसूल व्हावयाची असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणातील सर्व दोषींविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात आली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अद्याप रुपये २,३३,४४३/- एवढी रक्कम वसूल व्हावयाची आहे. तसेच गट विकास अधिकारी श्री.मडावी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरू असल्याचा अभिप्राय शासनाने दिला आहे. वसुलीची आणि विभागीय चौकशीची कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होईल, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, विभागीय चौकशीच्या अनुषंगाने संबंधितास ज्ञापन देण्यात आले असून विभागीय चौकशी येत्या दोन ते तीन महिन्यात पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. संबंधितांकडून अभिवेदन मागविण्यात आले होते. समितीने पुढे अशी विचारणा केली की, लेखापरिक्षकांचा आक्षेप हा सन २००८-२००९ मधील आहे आणि आज आपण सन २०१७ मध्ये आहोत. म्हणजे या प्रकरणाला आता ८ वर्षाहून अधिक काळ होऊन गेला आहे. ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आल्यामुळे प्रकरण उघडकीस आले. यासंदर्भात लेखापरिक्षकांनी आक्षेप काढला होता, परंतु जिल्हा परिषदेकडून कार्यवाही झाली नव्हती. लेखा परिक्षकांनी आक्षेप नोंदविला, पंचायती राज समितीने प्रत्यक्ष भेट देऊन याबाबत कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली आणि ८ वर्षाचा काळ लोटून देखील अद्याप कार्यवाही पूर्ण झालेली नाही. पंचायती राज समितीने या जिल्हा परिषदेला भेट देवून, ही बाब तपासली नसती तर हे प्रकरण उजेडातच आले नसते. अनुपालन अहवालाचे विवरणपत्रात **" जिल्हा परिषदेने करावयाची कार्यवाही " आणि " शासनाने केलेली कार्यवाही "** असे दोन स्तंभ आहेत. यामधील शासनाने केलेली कार्यवाही या स्तंभामध्ये केवळ एवढेच नमूद केले आहे की, रजा प्रवास सवलतीबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे व गट विकास अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे. या प्रकरणासंदर्भात शासनाने कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत. वास्तविक पाहता या प्रकरणासंदर्भात शासनाचे नेमके अभिप्राय काय आहेत, हे विभागाने नमूद करणे अपेक्षित होते. अशी काही प्रकरणे पंचायती राज समितीने निदर्शनास आणून दिल्यानंतर, लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर शासनाने जर स्वतःहून कार्यवाही केली असती किंवा या प्रकरणाला आळा घातला असता तर सर्व जिल्हा परिषदांना योग्य तो संदेश गेला असता. समितीने सन २००८-२००९ मधील एक प्रकरण तपासले आहे. परंतु सन २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२ मधील लेखापरिक्षकांनी काढलेल्या आक्षेपाबाबत जिल्हा परिषदेने कार्यवाही केली आहे याबाबतची माहिती समितीस अप्राप्त आहे. साक्षीच्या वेळी असे सांगितले आहे की, "एक महिन्यात कार्यवाही पूर्ण करु." मग यापूर्वीच आपण ही कार्यवाही का केली नाही, ही सर्व यंत्रणा कशासाठी आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस विदित केले की, लेखा आक्षेपात १९२ शिक्षकांनी खोटी बिले दाखवून रक्कम उचलण्यात आल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यापैकी एका शिक्षकाचे नाव दोन वेळा आल्यामुळे ही संख्या १९१ एवढी होत आहे. या सर्वाविरुध्द

शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात आली असून शिक्षाही देण्यात आली आहे. परंतु समितीने विचारणा केलेली रक्कम कधी वसूल करण्यात आली आणि जिल्हा परिषदेने कारवाई कधी केली या प्रश्नावर समितीस उत्तर प्राप्त झाले नाही. पंचायती राज समितीने भेट दिल्यानंतर हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे, ही बाब अतिशय गंभीर आहे. एका जिल्हा परिषदेमध्ये असे घडले असेल तर अन्य जिल्हा परिषदांमध्ये काय स्थिती असेल ? याचा विचार शासनाने करण्याची आवश्यकता होती. अधिकच्या रक्कमा कशा अदा केल्या जातात, खोटी बिले सादर करून शासकीय रक्कमांचा अपहार कसा केला जातो, या बाबी तपासण्यासाठी जिल्हापरिषदेकडे यंत्रणा असूनही केवळ जिल्हा परिषदेचे पैसे लुटण्याचे आणि लुटणा-यांना सहकार्य करण्याचे काम होत आहे, हे जनतेचे पैसे आहेत. असे प्रकार घडत असतील तर शासनाने अधिक गंभीरपणे या प्रकरणी कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु, शासनाच्या अभिप्रायावरुन शासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेतल्याचे दिसत नाही. शासनाने यासंदर्भात तातडीने जिल्हा परिषदेकडे विचारणा केली असती तर राज्यातील सर्व जिल्हा परिषदांवर त्याचा परिणाम झाला असता. आपल्याकडे संपूर्ण राज्याचा कारभार असल्यामुळे एवढी छोटी प्रकरणे शासन स्तरावर तपासली जाऊ शकत नाहीत किंवा सर्व लेखापरिक्षण मुद्यांचा पाठपुरावा करू शकत नाही, हे एकवेळ मान्य करता येईल, परंतु असे एखादे प्रकरण उघडकीस आणल्यानंतर तरी शासनाने गांभीर्याने त्याकडे बघण्याची आवश्यकता होती आणि अशा प्रकरणांना आळा कसा बसेल, यासंदर्भात उपाययोजना करण्याची आवश्यकता होती. शासनाने केवळ एक परिपत्रक निर्गमित केले आहे, अशा प्रकारचे नियम आहेत हे सर्वांनाच माहीत आहे. ते सर्वसामान्य नियम आहेत. परंतु हे प्रकरण समोर आल्यानंतर, लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर पंचायती राज समितीने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतल्यानंतरही जर शासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसेल तर विभागीय सचिवांच्या साक्षीला अर्थ राहाणार नाही. राज्य सरकारची काही जबाबदारी असूनही जिल्हा परिषदेकडून जी माहिती प्राप्त झाली ती केवळ समितीला पाठविण्याव्यतिरिक्त शासनाने कोणतेही काम केलेले नाही असे प्रतिपादन करून समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, आतापर्यंत वसूल केलेली रक्कम कधी वसूल करण्यात आली व उर्वरित रक्कम कधीपर्यंत वसूल करण्यात येईल, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस असे विदित केले की, रक्कम वसूल कधी करण्यात आली, याबाबतची तारीखवार माहिती जिल्हा परिषदेकडे उपलब्ध आहे ती समितीला सादर करण्यात येईल.

यावर प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग यांनी समितीस माहिती दिली की, केवळ जिल्हा परिषदांसाठीच नाही तर राज्यातील सर्व शासकीय कर्मचा-यांसाठी शासन निर्णय यापूर्वीच निर्गमित केला होता. परंतु दिनांक १० जून, २०१५ रोजी शासनाने पुन्हा एक शासन निर्णय निर्गमित केला असून त्यामध्ये दोन अधिकच्या मुद्यांचा समावेश केला आहे. रजा प्रवास सवलत उपभोगल्यानंतर प्रवास खर्चाचे देयकासोबत रेल्वे किंवा बसचे तिकीट सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच रजा प्रवास सवलतीचा लाभ घेणाऱ्या व त्यांना सदर सवलत मंजूर करणा-या अनुक्रमे अधिकारी/कर्मचारी यांचेकडून संगनमताने खोटी देयके सादर करून मंजूर करून घेतल्याचे आढळल्यास ते कडक शिक्षेस पात्र राहतील अशा दोन नवीन मुद्यांसह सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या आक्षेपाच्या संदर्भात शासनाचे अभिप्राय काय आहेत. समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली असता. या संदर्भातील लेखापरिक्षकांचा आक्षेप लक्षात घेऊन अधिका-यांबरोबर चर्चा करून समितीने शासनाकडे विचारणा केलेली आहे. परंतु जर शासनाकडून ही बाब गांभीर्याने घेतली जात नसेल तर या साक्षीला अर्थ राहणार नाही. वास्तविक पाहता, विधिमंडळाने उपस्थित केलेला हा मुद्दा शासनाने अतिशय गांभीर्याने घेण्याची आवश्यकता होती. शासनाकडून जिल्हा परिषदेकडे विचारणा व्हावयास हवी होती, आवश्यकता वाटली तर अधिकारी त्या ठिकाणी पाठवून पुन्हा एकदा तपासणी करावयास हवी होती, जिल्हा परिषदेला तातडीने कारवाई करण्यासंदर्भात सूचना द्यावयास हव्या होत्या व त्यानंतर समितीला अभिप्राय कळवावयास हवे होते. परंतु शासनाने या प्रकरणी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. शासनाचा मोठा व्याप असल्यामुळे अशा छोट्या गोष्टींकडे लक्ष देण्यास वेळ नसेल तर तसे अभिप्रायात नमूद करावयास

हवे होते. शासनाचा निधी जिल्हा परिषदेकडे जातो, जिल्हा परिषद ही स्वायत्त संस्था आहे. त्या ठिकाणी होणा-या शासकीय निधीचा वापर योग्य त-हेने होतो किंवा नाही, या संदर्भात लेखापरिक्षक तपासणी करतात आणि जिल्हा परिषद मात्र त्यांच्या आक्षेपावर काहीही करीत नाही. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची ही जबाबदारी होती. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला आश्वासित केले की, समितीच्या सूचनेनुसार शासनस्तरावर पुन्हा एकदा पुनरावलोकन (Review) करून तात्काळ पूर्तता करण्याबाबत आदेश दिले जातील व त्यासंदर्भात परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

समितीने पुढे असे प्रतिपादन केले की, सर्व जिल्हा परिषदांमध्ये हीच परिस्थिती आहे. लेखापरिक्षकांनी काढलेल्या आक्षेपांची वेळीच पूर्तता केली जात नाही. पंचायती राज समिती दौऱ्यावर जाते तेवढ्यापुरती दखल घेतली जाते, परंतु सर्व आक्षेपांबाबत तातडीने कार्यवाही झाली पाहिजे. त्यामुळे एक सर्वसामान्य परिपत्रक सर्वच जिल्हा परिषदांना निर्गमित करणे गरजेचे आहे. लेखापरिक्षकांनी काढलेल्या आक्षेपांची पूर्तता कशी व किती कालावधीत करावी, पूर्तता करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत, किती कालमर्यादा असली पाहिजे, या विषयी सविस्तर परिपत्रक काढणे आवश्यक आहे. तसेच ही कार्यवाही करण्यास विलंब लावणाऱ्या किंवा कार्यवाही करण्यात कुचराई करणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचेविरोधात कडक कारवाई करण्याची देखील तरतूद केली जावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याचा नेमका आढावा घेतला पाहिजे. अनेक वेळा असे होते की, आक्षेप काढल्यानंतरही अधिकारी/कर्मचारी यांना पाठीशी घालण्यासाठी त्याकडे दुर्लक्ष केले जाते, त्यामुळे सर्व जिल्हा परिषदांसाठी हे परिपत्रक निर्गमित करण्यात यावे अशी समितीने सूचना केल्यावर प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग यांनी समितीस विदित केले की, जे मुख्य आक्षेप आहेत, ते सर्व जिल्हा परिषदांना प्रसारित करावे. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला आश्वासित केले की, समितीने दिलेल्या सूचनेनुसार शासन कार्यवाही करेल. परंतु यापूर्वी समितीने दिलेल्या सूचनेनुसार लेखापरिक्षण मुद्यासंबंधी दोन वर्षापूर्वी परिपत्रक वितरीत केलेले आहे. आता जे नवीन मुद्दे समोर आले आहेत, त्याबाबत नव्याने परिपत्रक काढले जाईल. यावर समितीने अशी सूचना केली की, जिल्हा परिषदेवर जबाबदारी निश्चित केल्याशिवाय यात काही बदल होणार नाही. जिल्हा परिषदेला निधी देतो. शासनाचे पैसे अनाठायी वाया जाऊ नयेत, ही समितीची अपेक्षा आहे. जर कोणी या पैशांचा अपहार करीत असेल तर त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई झाली पाहिजे. पंचायती राज समितीने अनेक जिल्हा परिषदांना भेटी दिल्या व त्यामुळे या जिल्हा परिषदांच्या अशा प्रकारच्या प्रकरणांमधील कोट्यावधी रुपयांपर्यंतच्या रक्कमा वसूल झाल्या आहेत. याचा अर्थ असा आहे की, पंचायती राज समितीने भेट दिल्यानंतर रक्कमा वसूल होतात. मग अधिकारी स्तरावरच ही कार्यवाही का होत नाही, त्यामुळे याबाबत तातडीने कार्यवाही संबंधित विभागाने करणे आवश्यक असल्याचे समितीने सूचित केले.

## अभिप्राय व शिफारशी

गोंदिया जिल्हा परिषदेमधील शिक्षक आणि परिचरांनी रजा प्रवास सवलत योजनेत खोटी प्रवास देयके सादर करून रक्कम उचलल्या प्रकरणात रजा प्रवास सवलतीच्या अनुषंगाने वित्त विभागामार्फत सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक रप्रस-१११४/प्र.क्र.११/सेवा-५, दिनांक १०/०६/२०१५ **(परिशिष्ट १.१)** रोजीच्या शासन निर्णयात परिच्छेद ११ खालील टिप क्रमांक ६ मध्ये नमूद करण्यात आले की " रजा प्रवास सवलत उपभोगल्यानंतर प्रवास खर्चाचे देयकासोबत रेल्वे/बसची तिकीटे सादर करणे बंधनकारक राहील " तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १३ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, **रजा प्रवास सवलतीचा लाभ घेणाऱ्या व त्यांना सदर सवलत मंजूर करणाऱ्या अनुक्रमे कर्मचारी/अधिकारी यांचेकडून संगनमताने खोटी बिले सादर करून/मंजूर करून घेतल्याचे आढळल्यास, कडक शिक्षेस पात्र राहतील अशी तरतूद करून भविष्यात खोटी बिले सादर होणार नाहीत याची शासनाने तजवीज केल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते.**

खोटी रजा प्रवास देयक सादर करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी १९२ शिक्षकेत्तर कर्मचारी असून त्यापैकी एका शिक्षकाचे नाव दोन वेळा आल्यामुळे उर्वरित १९१ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असून कार्यालयाचे आदेश क्र.१२८० दिनांक १७.०६.२०१४ अन्वये त्यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेली आहे. तसेच ज्यांनी ही देयके पारित

केलेली आहेत, त्या अनुक्रमे १. श्री. पी.जी.इळपाते, कनिष्ठ सहाय्यक, २. श्री.पी.जी.फुलझेले, कनिष्ठ सहाय्यक, ३.श्री.जी.सी. बिरनवार, कनिष्ठ सहाय्यक यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपाची बंद केलेली आहे तसेच तत्कालीन गटविकास अधिकारी, श्री.बी.एन.मडावी यांचेवर कार्यवाही करण्यासाठी शासनास कळविण्यात आलेले आहे. **तत्कालिन गटविकास अधिकारी, श्री.बी.एन. मडावी यांचेविरुध्द कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाकडे अद्याप प्रलंबित आहे. याबाबत समितीस खेद आश्चर्य व्यक्त करते व त्यास होत असलेल्या विलंबाच्या कारणांसह ती कार्यवाही पूर्ण करून त्याचा अहवाल देखील समितीकडे पाठविण्यात यावा, तसेच सदरची वसुली तातडीने पूर्ण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावा अशीही समितीची शिफारस आहे.** तसेच खोटी रजा प्रवास सवलत सादर करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी १९१ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून आजपावेतो रु.७,५४,९९९/- वसूल करून शासनखाती जमा करण्यात आले आहे. उर्वरित रक्कम रुपये २,३३,४४३/- शिल्लक असून काही शिक्षक सेवानिवृत्त झालेले आहेत व काही शिक्षक मृत पावल्याने वसुली बाकी आहे. **समितीच्या मते दहा वर्षानंतरही आक्षेपाधीन रक्कम अद्याप वसूल होत नाही याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

सबब, समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने रजा प्रवास सवलतीमध्ये ज्या कर्मचाऱ्यांना जादा रक्कम अदा केली ती वसुल करण्यासंदर्भात अक्षम्य विलंब होत आहे. सदरची रक्कम समितीने शिफारस केल्यानंतर तातडीने वसुली करण्यासंदर्भात शासनाने पुढाकार घेणे आवश्यक होते, तथापि, याप्रकरणी समितीस तसे आढळून आले नाही. **समितीने तिच्या अहवालात ज्यादा देयके वसुल करण्यासंदर्भात शिफारस करूनही ज्या अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी होती त्यांनी कर्तव्यात कसूर केली असे समजून त्यांचेविरुध्द नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी व प्रलंबित रक्कम वसूल करुन शासनखाती जमा करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेली कार्यवाही समितीस कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यांत सादर करावी.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, गोंदिया

### अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर शेळ्यांचे गट वाटपाबाबत (परिच्छेद क्र. ३.७५८) सन २००८-०९ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील - परिच्छेद क्रमांक ११

सन २००८-०९ या वित्तीय वर्षात घटक योजनेंतर्गत अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर शेळ्यांचे गट वाटपासाठी जिल्हा परिषदेला रु.१,४०,०००/- तरतूद प्राप्त झाली होती व १० शेळी गटाचे भौतिक लक्ष्य होते. खात्याच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्राप्त तरतूद ८ पंचायत समित्यांना वाटप करण्यात आली आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, गोंदिया यांनी एकूण १४ लाभार्थ्यांच्या निवडीस मान्यता प्रदान करून तांत्रिक मंजुरी दिली आहे. याबाबत सन २००८-०९ या वर्षाच्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील खालील प्रमाणे मुळ अभिप्राय होते.

(१) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गोंदिया यांनी एकूण १४ लाभार्थ्यांच्या निवडीस मंजुरी प्रदान केली आहे. परंतु योजनेचे भौतिक लक्ष्य १० शेळी गटाचे असताना त्याकरिता मर्यादित अनुदान १,४०,०००/- उपलब्ध असताना १४ निवड झालेल्या लाभार्थीपैकी नेमक्या कोणत्या १० लाभार्थ्यांना लाभ दिला याची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

(२) विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण १०२००/प्र.क्र.२१२/पदुम-४, दिनांक १३ ऑगस्ट, २००३ अन्वये जारी केलेल्या सूचनानुसार क्र. २ (१) मध्ये नमूद केलेनुसार फक्त छोटे कुटुंब संकल्पना राबविणाऱ्या जोडप्यांनाच लाभ द्यावयाचा असताना जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गोंदिया यांचे पत्र दिनांक २० नोव्हेंबर, २००८ नुसार ६ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थी व दिनांक २१ जानेवारी, २००९ चे पत्रान्वये ८ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थी असे एकूण ४ लाभार्थी अविवाहित असताना त्यांना प्रत्यक्षात लाभ दिला असेल तर रक्कम वसुल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. तसेच श्री. मनोज पुंडलिक सुर्यवंशी, रा.खमारी, ता.तिरोडा यांना ३ अपत्य असताना व शेवटच्या अपत्याचा जन्म दिनांक ०४/०८/२००१ चा असताना त्यांना लाभ कसा देण्यात आला याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(३) विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थ्यांची निवड करताना त्यांचेकडे शेळी पालनासाठी पुरेशी जागा असणे आवश्यक आहे. श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे, खैरबोडी या लाभार्थ्यांकडे जागा असल्याचे ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र व इमारत कर भरल्याची पावती नसताना लाभ कसा काय देण्यात आला याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

(४) पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांना लाभ दिलेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत, त्यामुळे नेमका कोणत्या लाभार्थ्यांना लाभ दिला याबाबत सत्यता पडताळणी करता आलेली नाही.

उपरोक्त आक्षेपांसंदर्भात समितीला जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला.

(१) जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक, गोंदिया यांनी एकूण १४ लाभार्थी निवडीस मान्यता प्रदान केलेली असून प्राप्त तरतूद रु.१,४०,०००/- नुसार भौतिक लक्ष्य १० शेळी गटाचे होते. त्यानुसार १० लाभार्थ्यांना ज्येष्ठतेनुसार अनुदानाच्या मर्यादेत लाभ देण्यात आलेले आहे. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची यादी नस्ती सोबत आहे.

(२) सन २००८-०९ चे खात्याच्या मार्गदर्शक सूचना पत्र क्र.एसडीएस/१८/१४२८/५५०/१२४५/०८/पंस-१२, पुणे १, दिनांक ०६/०६/२००८ अन्वये अविवाहित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येऊ नये असा उल्लेख नाही, ज्या अविवाहित लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे ते कुटुंब छोटे कुटुंब या संकल्पनेत मोडतात. श्री. मनोज पुंडलिक सुर्यवंशी, रा. खमारी, ता. तिरोडा यांना ३ अपत्य असून कु.नेहा जन्म दिनांक १४/१०/१९९६, रितीक जन्म दिनांक ४/८/२००१ व रोहित जन्म दिनांक ४/८/२००१ असून रितिक व रोहित हे जुळे असून त्यांचा जन्म एकाच दिवशी झालेला आहे, त्यामुळे या लाभार्थ्यास लाभ देण्यात आलेला आहे. जुळे असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.

(३) श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे, रा.खैरबोडी, ता.तिरोडा शेळीपालनाकरिता जागा असल्याबाबत प्रमाणपत्र प्राप्त करून नस्ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

(४) पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र नस्ती सोबत जोडण्यात आलेले आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला पहिला अहवाल सादर करून पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या :-

" शेळी वाटप योजनेचे भौतिक लक्ष्य १० शेळी गट व मर्यादित अनुदान रु.१,४०,०००/- असताना जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गोंदिया यांनी प्रत्यक्षात १४ शेळी गट लाभार्थ्यांची निवड केली होती. तथापि, निवडलेल्या १४ लाभार्थ्यांपैकी नेमक्या कोणत्या १० लाभार्थ्यांना लाभ दिला याची माहिती लेखा परीक्षणाच्या वेळी अप्राप्त होती.

दिनांक १३ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये " छोटे कुटुंब " या संकल्पनेनुसार असलेल्या कुटुंबांनाच या योजनेचा लाभ द्यावयाचा असताना प्रत्यक्षात योजना राबविताना ४ अविवाहित लाभार्थी तसेच एका ३ अपत्ये असलेल्या कुटुंबास या योजनेचा लाभ देण्यात आल्याची माहिती समितीसमोर आली आणि या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे मत समितीने प्रतिपादन केले.

या लाभार्थ्यांपैकी श्री. अचलकुमार ताराचंद्र चंद्रिकापुरे यांच्या कुटुंबातील आई व वडील यांच्याकडे जात प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना त्यांच्या मुलांच्या शाळेच्या दाखल्याच्या आधारे लाभ देण्यात आलेला होता. तथापि, अशी तरतूद शासन निर्णयात नाही.

प्रत्येक शासकीय योजनांचे लाभ छोट्या कुटुंबाला देण्याबाबतची तरतूद शासन निर्णयात आहे. तथापि, छोट्या कुटुंबाच्या व्याखेमध्ये पती-पत्नी व दोन मुले अशी नोंद आहे. तथापि, जर जुळी मुले जन्माला आली तर त्यांना एक व्यक्ती म्हणून की दोन अविवाहित मुले म्हणून लाभ द्यायचा याचा सुस्पष्ट खुलासा होणे गरजेचे आहे असे मत समितीने व्यक्त केले.

या प्रकरणी, भविष्यात अशाप्रकारचे लाभ लाभार्थ्यांना देताना शासनास कोणत्याही प्रकारे अडचण येऊ नये त्यास्तव योजना लागू करण्यात विलंब होणे वा चुकीच्या पध्दतीने ती राबविल्यामुळे शासनाची अडचण होऊ नये यासाठी " छोटे कुटुंब " या संकल्पनेबाबत त्याचप्रमाणे जुळी मुले जन्माला आल्यास अशा लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासन स्तरावर सर्वंकष निर्णय घेण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागानी समन्वय साधून विधी व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात यावा व त्यानुसार साक्षीच्या अनुषंगाने उक्त कुटुंबाच्या व्याख्या नव्याने करून त्यात त्रुटी असलेल्या बाबींचा समावेश करून त्याचा क्षेत्रीय स्तरावर दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घेवून साक्षीच्या वेळी उपस्थित झालेल्या प्रत्येक मुद्यास न्याय मिळेल आणि राज्यातील प्रत्येक गरजू व पात्र लाभार्थ्याचे योग्य ते हित साधले जाईल असा स्वयंस्पष्ट, परिपूर्ण व सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. "

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, गोंदिया यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांना १० शेळ्या + १ बोकड असा शेळी गट वाटप करणे ही योजना शासन निर्णय व आयुक्त, पशुसंवर्धन कार्यालयाच्या स्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये राबविण्यात आलेली आहे. छोटे कुटुंबाच्या अनुषंगाने सर्वसमावेशक शासन निर्णय शासन स्तरावरून निर्गमित करण्याची विनंती शासनास केलेली आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

**पशुसंवर्धन विभागाचे अभिप्राय :-**

सामान्य प्रशासन विभाग व विधी व न्याय विभाग यांचेशी समन्वय साधून पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत, राज्यस्तरीय आणि जिल्हा वार्षिक योजनांमध्ये वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र लाभार्थ्यांना छोटे कुटुंबाच्या अनुषंगाने अटी व शर्ती लागू करणेबाबत सर्वसमावेशक शासन परिपत्रक क्रमांक पंरास २०१४/प्र.क्र.१५३/पदुम ४, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेले असून त्याची प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत पहिला अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, समितीच्या शिफारशीनुसार, छोटे कुटुंब या संकल्पनेबाबत जुळी मुले जन्माला आल्यास अशा लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासन स्तरावर सर्वंकष निर्णय घेण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागांनी समन्वय साधून विधी व न्याय विभागाचा सल्ला घेवून कुटुंबांची व्याख्या नव्याने तयार करणे आवश्यक होते. याबाबत विभागाला काही अधिक माहिती द्यावयाची आहे का, यावर उप सचिव कृषि व पदुम (पशुसंवर्धन), विभाग यांनी समितीस विदित केले की, यापूर्वीच्या शासन निर्णयानुसार आई, वडील व दोन मुले यांचा लाभार्थ्यांमध्ये समावेश करण्यात आला होता. गोंदिया जिल्ह्यात जुळ्या मुलांमुळे तीन लाभार्थ्यांना लाभ मिळू शकला नाही. जुळी मुले असल्यास ते एकच अपत्य समजून त्यांना लाभ देण्यात यावा अशा प्रकारचा सामान्य प्रशासन विभागाचा सन २००५ मधील शासन निर्णय होता. त्याच अनुषंगाने पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत, राज्य स्तरीय आणि जिल्हा वार्षिक योजनांमध्ये वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र लाभार्थ्यांना अटी व शर्ती लागू करणेबाबत सर्वसमावेशक शासन परिपत्रक क्रमांक पंरास २०१४/प्र.क्र१५३/पदुम ४, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

राज्य लोकसंख्या धोरण : - पशुसंवर्धन विभाग हे धोरण दिनांक १३ ऑगस्ट, २००३ **(परिशिष्ट २.१)** रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात अंमलात आलेले असून पशुसंवर्धन विभागातील वैयक्तिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी " लहान कुटुंब " या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आलेला आहे. परंतु सन २००५ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने लहान कुटुंबाचे बाबतीत अधिसूचना काढली असून त्यामध्ये एखाद्या जोडप्यास हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर केवळ एकच मुल असेल त्याबाबतीत नंतरच्या एका प्रसूतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल असे स्पष्टीकरण देण्यात आलेले असले तरी पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना लाभार्थ्यांला जुळ्या मुलांमुळे तीन अपत्य असल्याच्या कारणाने लाभापासून वंचित राहावे लागत होते; त्यामुळे समितीने यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेवून स्वयंस्पष्ट, परिपूर्ण व सर्वसमावेशक निर्णय निर्गमित करावा अशी शिफारस केलेली होती.

समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७ रोजी स्वयंस्पष्ट परिपत्रक **(परिशिष्ट २.२)** निर्गमित केले आहे. सदर परिपत्रकानुसार यापुढील काळामध्ये एखाद्या जोडप्यास दिनांक २८ मार्च, २००५ रोजी किंवा त्यानंतर केवळ एकच मुल असेल त्याबाबतीत नंतरच्या एका प्रसूतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. **परिणामी, यापुढील काळात छोटे कुटुंब या व्याख्येत जुळ्या मुलांमुळे तीन अपत्य असणाऱ्या अधिक लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेता येणार आहे. पशुसंवर्धन विभागाने पंचायती राज समितीच्या शिफारशीनुसार विलंबाने का होईना अशा प्रकारचे परिपत्रक निर्गमित केल्यामुळे समिती समाधान व्यक्त करते.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, गोंदिया

### ६ महिने ते १ वर्ष तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांना पौष्टिक आहार म्हणून नाचणी, खीर पुरविण्याबाबत (परिच्छेद क्रमांक ३.९८६) सन २००८-२००९ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालावरील परिच्छेद क्रमांक २

पौष्टिक आहार नाचणीसाठी रक्कम रु.८,८६,४१२/- खर्च करण्यात आले. याबाबत सन २००८-२००९ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील मूळ अभिप्राय खालीलप्रमाणे होते.

(१) उपचार शास्त्रभूत आहारपुरवठा महालक्ष्मी गृह उद्योग, नांदेड करत होते. तथापि सन २००८-०९ मध्ये कोणत्या पुरवठा धारकाकडून सदर साहित्य खरेदी करावयाचे याबाबत शासनाचे आदेश व करारनामा प्राप्त नसताना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी परस्पर जिल्हाधिकारी व समितीची मंजुरी घेऊन खर्च केलेला आहे, याबाबत शासनाची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग क्र.भाखंस/१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २/१/१९९२ आणि समक्रमांकित शासन निर्णय दिनांक ३०/३/१९९४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार खरेदी करण्यात आली नाही.

(३) फक्त ५० दिवस उपचार शास्त्रभूत आहार दिल्याने कुपोषण किती प्रमाणात कमी झाले, संबंधितांना किती लाभ झाला याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त केलेली नाहीत.

(४) महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र.एक.वि.०६/प्र.क्र.११८/का-५, दिनांक १ जून, २००७ नुसार मूल्यवर्धीत कर भरणे आवश्यक असताना रक्कम रुपये ८,८६,४१२/- च्या २ टक्के मूल्यवर्धीत कराची रक्कम रुपये १७,७२८ कपात करण्यात आली नाही. सदरहू रक्कम वसूल करून योग्य लेखाशिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांसंदर्भात समितीला जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला.

(१) महालक्ष्मी गृह उद्योग, नांदेड यांचेकडून उपचार शास्त्रभूत आहाराचा पुरवठा पुरवठाधारकाकडून बंद झाल्यामुळे सन २००८-०९ मध्ये उपचार शास्त्रभूत आहाराचा पुरवठा झालेलाच नाही. शासनाचे परिपत्रक दिनांक २८/१०/२००५ अन्वये ६ महिने ते १ वर्ष व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांसाठी पाककृती २८ नुसार नाचणीचा दर जिल्हाधिकारी पोषण आहार समिती यांचेकडून मंजुरी घेऊन महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे शासन निर्णय दिनांक २३/५/२००७ नुसार कार्यालयास आवश्यक असणारी स्टेशनरी, उपकरणे, शालेय साहित्य तसेच इतर नित्योपयोगी वस्तुची खरेदी महाराष्ट्र को-ऑप. कंझुमर्स फेडरेशन मर्यादित, मुंबई या संस्थेकडून प्राधान्याने खरेदी करावी असे नमूद केले आहे. या आधारावर महाराष्ट्र को-ऑप. कंझुमर्स फेडरेशनला पुरवठा आदेश दिलेला होता. शासनाच्या निकषाप्रमाणेच खरेदी केली आहे.

(२) शासनाच्या ध्येय धोरणानुसारच खरेदी केलेली आहे.

(३) उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले असून ते नस्तीस संलग्न आहेत.

(४) मूल्यवर्धीत कराच्या नियमावलीतील ९ A नुसार खाद्य प्रक्रियेशी संबंधित बाबींवर मूल्यवर्धीत करात सूट असल्यामुळे मूल्यवर्धीत कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

**पूरक पोषण आहार पुरवठ्याबाबत (परिच्छेद क्र.३.९८७) सन २००८-२००९ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालावरील परिच्छेद क्र.३**

वरील परिच्छेदाप्रमाणे प्रस्तुत परिच्छेदातही पूरक पोषण आहार पुरवठाबाबत रक्कम रुपये ९३,१४,२१६/- खर्च करण्यात आले. याबाबत मूळ अभिप्राय खालीलप्रमाणे होते.

(१) सन २००८-०९ मध्ये मंजूर तांदुळापैकी (५००-३१३.२२) १८६.७८ क्विंटल तांदळाची उचल करण्यात आलेली नाही.

तसेच प्रकल्प आमगांव व गोरेगांव येथे तांदळाच्या वाहतुकीबाबत आदेश देण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.क.शि.२००५/प्र.क्र.१४१/का-५, दिनांक १९ मे, २००६ मधील पाककृती आठवड्यातून तीन दिवस तांदळाचे पदार्थ देणे आवश्यक आहे. तरी तशी कार्यवाही झालेली नाही व त्यामुळे प्रकल्प आमगांव व गोरेगांव येथे योजना शासन निर्देशानुसार राबविण्यात आली नाही.

(२) उशिरा पुरवठा बचत रक्कम रुपये ४२,७४०/- दंड पुरवठाधारकाकडून वसूल करण्यात आले नाही. सदरहू वसुली होणे आवश्यक आहे.

(३) पुरवठादाराने पुरवठा न केलेल्या सोया फ्लोअर, मीठ व हळदीचे चाचणी अहवाल प्राप्त केलेले आहेत. प्रकल्प-स्तरावरून साहित्य चाचणीसाठी पाठविलेले नसताना चाचणी अहवाल बिजकासोबत सादर करण्यात आले आहे.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना, मुंबई यांचे पत्र क्र. २०११-०७, दिनांक ५-१०-२००७ अन्वये दिनांक १-४-२००५ पासून मूल्यवर्धीत कर भरणे आवश्यक आहे. त्यामुळे रुपये ९३,१४,२१६/- चे २ टक्के मूल्यवर्धीत कराची रक्कम रुपये १,८६,२८४/- वसूल होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांसंदर्भात समितीला जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

(१) जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे पत्र दिनांक २२ मे, २००८ नुसार ५०० क्विंटल तांदळाचा पुरवठा करण्यात आला. त्यापैकी ३१३.२२ क्विंटल तांदूळ कंझ्युमर्स फेडरेशन यांनी उचल करून ज्या अंगणवाड्यामध्ये बचत गटाकडून पुरवठा होत नाही अशा अंगणवाड्यामध्ये पुरवठा केला आहे व उर्वरित तांदूळ ज्या अंगणवाड्यामध्ये बचत गटामार्फत पुरवठा केला जातो अशा अंगणवाड्यांना रेशन दुकानामार्फत पुरवठा केलेला आहे. प्रकल्प आमगांव व गोरेगांव येथे बचत गटामार्फत आहाराचा पुरवठा होत असल्यामुळे फेडरेशनकडून तांदळाची वाहतुक सदर प्रकल्पांना करण्यात आली नाही. फेडरेशनकडून पुरवठा करण्यात आला नसला तरी सदर प्रकल्पामध्ये आहाराचा पुरवठा बचत गटामार्फत झालेला आहे. त्यामुळे प्रकल्प आमगांव व गोरेगांव येथे शासन निर्देशानुसार योजना राबविण्यात आली आहे. सदर बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून त्याबाबत प्रमाणपत्र घेतले असून नस्तीस संलग्न आहे.

(२) या कार्यालयाचे पुरवठा आदेश क्रमांक ५१२-२००८, दिनांक १४-०८-२००९ नुसार सोयाबीन फ्लोअरचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पाककृतीमध्ये सोयाबीन फ्लोअरमध्ये प्रथिने जास्त असल्यामुळे ते पुरवठा करण्याकरिता आदेशित केले होते. परंतु सोयाबीन फ्लोअर उपलब्ध नसल्यामुळे फेडरेशनने सोयाबिन फ्लोअरचा पुरवठा केला नाही, त्यामुळे सोयाबिन फ्लोअरची रक्कम फेडरेशनला देण्यात आलेली नाही. त्याकरिता दंड आकारण्यात आला नाही.

(३) सडक/अर्जुनी प्रकल्पात पुरवठाधारकाने सोयाबीन फ्लोअरचा पुरवठा केलेला नाही. चाचणी अहवालात बाकी प्रकल्पाप्रमाणेच सोयाबीन फ्लोअरची टेस्टींगबाबत अहवाल सादर केल्याचे दिसून येते. तसेच मोर/अर्जुनी मध्ये टेस्टींग अहवाल दिनांक १६-०९-२००८ ला पाठविले होते. दिनांक १७-०९-२००८ ला टेस्टींग करुन पत्र क्र.१८४-२००८ दिनांक १८-०९-२००८ ला परत पाठविले आहे. हळद व मिठाचा उल्लेख टेस्टींग रिपोर्टमध्ये प्रयोगशाळा, नागपूर यांनी केल्याचे दिसून येते. यामध्ये या कार्यालयाकडून कोणतीही चूक झालेली नाही व पुरवठा न झालेल्या साहित्याचे देयक सुध्दा काढण्यात आलेले नाही.

(४) मूल्यवर्धीत कराच्या नियमावलीतील ९ A नुसार खाद्य प्रक्रियेशी संबंधित बाबींवर मूल्यवर्धीत करात सूट असल्यामुळे मूल्यवर्धीत कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ जून, २०१४ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची उपरोक्त मुद्दा क्रमांक ३.९८६ व ३.९८७ बाबत एकत्रित साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने कुपोषित मुलांना पौष्टिक आहार म्हणून नाचणी व खीर पुरविण्याबाबत सन २००८-०९ मध्ये शासनाची मंजुरी न घेण्याची कारणे काय आहेत ? पुरवठादाराने आहाराचा पुरवठा केला नाही तर कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात येते व शासनाचे उपचार शास्त्रभूत आहार पुरवठ्याबाबत

निश्चित धोरण काय आहे, याबाबत माहिती मागितली. त्याची माहिती देताना विभागीय सचिवांनी, सध्या उपचार शास्त्रभूत आहार पुरवठा पुरविला जात नाही. ० ते ३ वर्षापर्यंतची मुले अंगणवाड्यांमध्ये पोहोचू शकत नाहीत किंवा जात नाही. ३ वर्षावरील मुले अंगणवाड्यांमध्ये जातात. ३ वर्षाच्या आतील मुलांसाठी टीएचआर हा पर्याय अवलंबिलेला आहे. त्यात मायक्रो न्युट्रिएंट युक्त शिरा, उपमा व सत्तू मिश्रित टीएचआर पुरविण्यात येतो. टीएचआरमध्ये ते रेडी मिक्स असते. अंगणवाडीमध्ये रोज येऊ शकत नाहीत अशा मुलांसाठी आहार म्हणून त्यांची आई घरामध्ये गरम पाण्यात ही पावडर शिजवू शकते असा खुलासा केला.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला पहिला अहवाल सादर करून पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या :-

" आहाराअभावी कुपोषित मुलांच्या संख्येत वाढ होऊ नये यासाठी महालक्ष्मी गृह आहार पुरवठा, नांदेड यांचेसोबत जिल्हा परिषदेने करार केला होता. त्यांच्याकडून मुलांसाठी नाचणी, खीरपुरवठा होणार होता. नाचणी खरेदीसाठी रक्कम रुपये ८,८६,४१२/- सदर ठेकेदारास देण्यात आली. तथापि, त्यावरील ४% दराने मूल्यवर्धीत कर (व्हॅट) वजावट करण्यात आली नाही. त्या कराची एकूण रक्कम रु.३५,५५६/- एवढी होत होती.

तथापि, दिनांक ३१ मार्च, २००८ पासून ठेकेदाराने आहार पुरवठा बंद केला. ३ वर्षावरील मुले अंगणवाडीमध्ये जातात. त्यामुळे त्यांना तेथे पौष्टिक आहार मिळतो. परंतु ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांना अंगणवाडीमध्ये प्रवेश मिळत नसल्यामुळे त्यांना उपचार शास्त्रभूत आहार उपलब्ध होत नाही. त्यासाठी त्यांना टीएचआर म्हणजेच मायक्रो न्युट्रिएंट युक्त शिरा, उपमा वा सत्तू मिश्रित आहार पुरविण्यात येतो.

आहार पुरवठा होत नसेल तर जिल्हा आहार समितीने पाककृती निश्चित करणे आवश्यक असते. कारण ठेकेदार जिल्हा परिषदेमार्फत तालुक्याच्या ठिकाणी एकाच वेळी पुरवठा करतो, त्यामुळे प्रत्येक गावामध्ये तो पोहोचण्यासाठी ३-३ महिन्यांचा विलंब होतो. त्यास्तव आहाराअभावी तीन वर्षाखालील मुले कुपोषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी शासनाने हॉटकूकचा पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे. तथापि, त्याची माहिती अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांना देण्यात आलेली नसल्यामुळे आयएसडीएस योजनेचा हेतू सफल होऊ शकत नाही. अंगणवाड्यांसाठी दिलेला निधी आहे तोही अपूर्ण आहे, त्यामुळे त्यात पुरेशी वाढ होणे गरजेचे आहे, असे समितीचे मत आहे.

यास्तव टीएचआर आहार नियमितरित्या जिल्ह्याच्या सर्व ठिकाणी वेळेवर पुरविण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे टीएचआर हा काही विशिष्ट परिस्थितीमध्ये व अपरिहार्य कारणास्तव लाभार्थ्यांपर्यंत पोचण्यास विलंब होत असेल तर त्यास हॉटकूकचा पर्याय शासनाने उपलब्ध करून दिलेला असून देखील सदर योजना राबविणाऱ्या यंत्रणेसह ही योजना माहीत नसल्याकारणाने या योजनेची माहिती यंत्रणा तसेच लाभार्थ्यांपर्यंत पोचण्यासाठी व्यापक स्वरूपात प्रसार व प्रचार करण्यात यावा. सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पुरेशा निधीची तरतूद करून सदर निधी विहित कालावधीत संबंधीतांना मिळावा तसेच सर्व संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सकस आहार कसा द्यावा याबाबत दरवर्षी प्रशिक्षण देण्याबाबत कार्यशाळा आयोजित करावी अशी शिफारस समिती करीत आहे. उक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

मूल्यवर्धीत कर (व्हॅट) लागू करावा अथवा नाही याबाबत राज्य शासनाच्या दोन विभागांमध्ये दुमत असल्याचे समितीस आढळून आले. तसेच अद्याप ठेकेदारांकडून वसूल न केलेली रु. ३५,५५६/- एवढ्या रकमेचा मूल्यवर्धीत कर (व्हॅट) वसुलीसाठी पाठपुरावा करून ती रक्कम लवकरात लवकर वसूल करावी व वरील प्रकरणी केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. "

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, गोंदिया यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

(१) शासनाने अंगणवाडीतील बालकांना आहार पुरवठा करण्यासाठी हॉटकूकचा पर्याय उपलब्ध करून दिला असून सदर योजनेसंबंधी अंगणवाडीतील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना हॉटकूक देण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे आयसीडीएस योजनेचा हेतू सफल झालेला आहे.

(२) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत ९ प्रकल्प कार्यरत असून १५४७ अंगणवाडी व मिनी अंगणवाडी कार्यरत आहेत. सदर प्रकल्पातील अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना THR आहार नियमितरित्या वेळेच्या वेळी पुरविण्यात येत आहे.

(३) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत कार्यरत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत जिल्ह्यात एकूण ९ प्रकल्प कार्यरत आहेत. समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सकस आहार कसा द्यावा याबाबत प्रकल्पनिहाय प्रशिक्षण देण्याबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती व त्याबाबतचे सर्व प्रकल्पांकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र यापूर्वीच अहवालासोबत पाठविण्यात आलेले आहेत.

(४) मूल्यवर्धित कराबाबत Maharashtra Value Added Tax Act, २००२ मधील ९ A नुसार धान्य, कडधान्य, पीठ यांना मूल्यवर्धित करातून सूट देण्यात आली आहे, त्यामुळे मुल्यवर्धित कराची वजावट करण्यात आली नाही. मूल्यवर्धित कर कपातीबाबत शासनाकडून दिनांक २०-१-२०१४ व दिनांक १३-६-२०१४ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-**

(१) ते (३) शासन स्तरावर कार्यवाही अपेक्षित नाही.

(४) वित्त विभागाच्या कायद्यात तशी तरतूद असल्याने सदरची सूट देण्यात आली आहे.

**वित्त विभागाचे अभिप्राय :-**

मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अन्वये अंगणवाडीतील बालकांना सन २००८-०९ व २००९-१० च्या दरम्यान पुरविण्यात आलेल्या पूरक पोषण आहाराबाबत, मूल्यवर्धित कराची कपात करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांवर येणार नाही. कारण विक्री झालेल्या वस्तुंच्या किंमतीवर मूल्यवर्धित कराची भरणा करण्याची जबाबदारी पूर्णतः ती वस्तू पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यावर आहे. त्यामधून कपात करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेस नसल्याने त्यांनी कर कपात करणे अपेक्षित नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत पहिला अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, टीएचआर आहार नियमितरित्या जिल्ह्यांच्या सर्व ठिकाणी वेळेवर पुरविण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात असे सांगण्यात आले होते, मात्र तसे केलेले समितीला दिसून आले नाही. तत्संदर्भात विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, परिपत्रक निर्गमित केले आहे की नाही, याबाबत जिल्हा परिषदांत निर्णय घेताना मतभिन्नता असू शकते. त्यामुळे त्या

अनुषंगाने जिल्हा परिषदांनी मूल्यवर्धीत कर लावू नये या संदर्भात शासनाने नव्याने परिपत्रक काढले आहे का ? या समितीच्या प्रश्नावर उप सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी माहिती दिली की, समितीने मूल्यवर्धीत कर लावण्याच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. ग्रामविकास विभागाने महिला व बाल विकास विभागामार्फत वित्त विभागाकडे या संदर्भात पाठपुरावा सुरू केला आहे. वित्त विभागाने या संदर्भात मार्गदर्शन दिले आहे. वित्त विभागाचे या संदर्भात ११ एप्रिल, २०१७ चे पत्र आहे. ग्रामविकास विभागामार्फत सर्व जिल्हा परिषदांना या संदर्भात कळवायचे आहे. आता शासन परिपत्रक निर्गमित करीत आहे.यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने मूल्यवर्धीत कराच्या रकमेची ठेकेदारांकडून आकारणी करू नये, अशा प्रकारचे परिपत्रक काढणार आहात का ? यावर उप सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, " होय " शासन परिपत्रक काढणार असून वित्त विभागाकडून पत्र प्राप्त झाले आहे. यावर प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांनी समितीस माहिती दिली आहे की, आता वस्तू व सेवा कर येणार आहे. त्यामुळे पुढील काळात सुधारणा होईल.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत ६ महिने ते १ वर्ष तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांना पौष्टिक आहार म्हणून नाचणी, खीर पुरविण्याच्या कामामध्ये पुरवठादारांकडून महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एक.वि.०६-प्र.क्र.११८-का-५, दिनांकित १ जून, २००७ नुसार मूल्यवर्धित कराची कपात करणे आवश्यक होते; परंतु मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या तरतुदीनुसार धान्य, कडधान्य पीठ यांना मूल्यवर्धित करापासून सूट असल्यामुळे अशा प्रकारची कर कपात केली नसल्याची माहिती समिती समोर आली. या प्रकरणात मूल्यवर्धित कर कपात आवश्यक असल्यास ती लवकरात लवकर वसूल करण्याबाबत समितीने शिफारस केलेली होती. महिला व बालविकास विभागाने वित्त विभागाकडे अशा प्रकारे मूल्यवर्धित कर कपात करायची किंवा नाही यासंदर्भात पाठपुरावा सुरू केलेला असून दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वित्त विभागाने आपले अभिप्राय महिला व बालविकास विभागास कळविल्याची माहिती समितीस प्राप्त झाली आहे. त्यामुळे **महिला व बालविकास विभागाने अशा प्रकारच्या पुरवठादारांकडून मूल्यवर्धित कराची कपात करावयाची किंवा कसे याबाबतचे परिपत्रक सर्व संबंधितांना तातडीने निर्गमित करावे व उक्त परिपत्रकाची प्रत समितीला तीन महिन्यांच्या आत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

सद्य:स्थितीमध्ये दिनांक १ जुलै, २०१७ पासून संपूर्ण देशामध्ये वस्तू व सेवा कर ही नवीन कर प्रणाली अंमलात आलेली आहे. प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय) यांनी यासंदर्भात वस्तू व सेवा कर अंमलात आल्यामुळे या पुढील काळामध्ये खूप सुधारणा होतील असे समितीला आश्वासित केले आहे. परंतु ज्याप्रमाणे मूल्यवर्धित कर अधिनियमात धान्य व पीठ इत्यादी वस्तूंना मूल्यवर्धित करातून सूट दिली असूनही शासनाच्या विविध विभागांमध्ये संदिग्धतेचे वातावरण निर्माण झाले व प्रस्तुत प्रकरणाप्रमाणे लेखा आक्षेप घेण्यात आले आहेत. **अशा प्रकारचे लेखा आक्षेप यापुढील काळामध्ये उद्‌भवू नयेत याकरीता महाराष्ट्र जिल्हा परिषद व लेखासंहिता यातील तरतुदीनुसार विविध निविदाधारक, पुरवठादार, बांधकाम ठेकेदार, गौण खनिज यांचे उत्खनन करणारे, विविध वस्तूंचा पुरवठा करताना त्यात करावयाच्या वस्तू व सेवा कराची कपात या सर्वांच्या बाबतीत शासनाच्या विविध विभागांमार्फत असंख्य योजनांद्वारे कामे करीत असताना अशी संदिग्धता निर्माण होऊ नये म्हणून वित्त व नियोजन विभागाने या संदर्भात सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा व त्याबाबतीत तीन महिन्यांच्या आत समितीला अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.**

**प्रकरण चार**

## जिल्हा परिषद, गोंदिया

### सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (परिच्छेद क्र. ३.१०३६) सन २००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालावरील परिच्छेद क्र.२७

सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ५ | अपहार प्रकरणे | गोंदिया | सामान्य प्रशासन विभाग | २७ | ८९९६६१/- |

उपरोक्त आक्षेपांसंदर्भात जिल्हा परिषद गोंदिया यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला.

सन २००९-१० मध्ये अफरातफरीच्या ७८ प्रकरणात रु.८,९९,६६०.९५ एवढी रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी मार्च, २०१३ अखेर रु.२,७०,७९१.४९ एवढी रक्कम ३६ प्रकरणांत वसुल झालेली असून रु.६,२८,८६९.४६ एवढ्या रकमेची ४२ प्रकरणे वसुली अभावी प्रलंबित आहेत. वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०७ जानेवारी, २०१४ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असा खुलासा केला की, सन २००९-२०१० मध्ये अफरातफरीच्या ७८ प्रकरणात रु.८९९६६० एवढी रक्कम गुंतलेली होती. मार्च २०१३ अखेर रु.२७०७९१ एवढी रक्कम ३६ प्रकरणात वसूल झालेली असून रु.६२८८६९ एवढी रक्कम ४२ प्रकरणातून वसूल होणे प्रलंबित आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २६ जून, २०१४ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने, सन २००९-१० या अहवाल वर्षात एकूण ७८ प्रकरणांमध्ये किती प्रकरणांची वसुली करण्यात आली आणि किती प्रकरणे प्रलंबित आहेत, अपहार प्रकरणी आतापर्यंत किती जणांवर एफआयआर दाखल करण्यात आले, अपहार करणाऱ्या ग्रामसेवकांचा चौकशी अहवाल मागील वर्षी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविला असून या प्रकरणी निर्णय का घेण्यात आला नाही, ज्या ग्रामसेवकांवर अविश्वास दाखविण्यात आला आहे, अशा ग्रामसेवकांची पुन्हा त्याच ठिकाणी बदली का करण्यात आली, यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली इत्यादी मुद्यांवर समितीने माहिती घेतली.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला पहिला अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या :-

" सन २००९-२०१० या वर्षात जिल्हा परिषदेअंतर्गत झालेल्या अफरातफर, अग्रिम घेऊन हिशोब न देणे तसेच कोर्ट कचेरीच्या कामासाठी घेतलेल्या पैशातील शिल्लक रक्कम न देणे अशा एकूण ७८ प्रकरणांपैकी ४८ प्रकरणी अद्याप वसुली प्रलंबित आहे. त्या वसुलीची रक्कम ६ लाख ६७ हजार एवढी होती. त्यापैकी १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली व त्याद्वारे रु.१ लाख १५ हजार वसुल करण्यात आले होते.

अपहार केलेली रक्कम जर वेळीच वसुल होत नसेल तर ही बाब योग्य नाही अशी समितीने खंत व्यक्त केली व या प्रकरणी विभागीय नियंत्रण ठेवण्याची गरज प्रतिपादित केली. सबब, समिती शिफारस करते की, उर्वरित सुमारे रु.५.५२ लाख रक्कम तात्काळ वसूल करुन त्याबाबतचा अहवाल समितीकडे एक महिन्याच्या आत तात्काळ पाठविण्यात यावा. ”

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, गोंदिया यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत अफरातफर विषयक एकूण ७८ प्रकरणे प्रलंबित असल्याचे समितीच्या अहवालात नमूद आहे. मात्र लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक २७ नुसार एकूण ७७ प्रकरणात रु.८,९९,६६०.९५ एवढी रक्कम गुंतलेली होती. त्यानुसार ४९ प्रकरणाची रु.३,६८,६३६.२९ इतकी रक्कम वसूल झालेली असून उर्वरित २८ प्रकरणातील रु.५,३१,०२४.६६ इतकी रक्कम वसूल करणे बाकी आहे. सदर वसूली बाबत नमूद करण्यात येते की, सदर वसूली संदर्भातील एक सरपंच व एक ग्रामसेवक मयत झालेले असून उर्वरित सहा सरपंच व ११० ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी यांच्याकडून वसूली करण्यासंबंधाने जिल्हा परिषद स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. आवश्यकतेनुसार जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूलीची रक्कम वसूल करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांचेकडे आवश्यक ते प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे शासनाने आपले लेखी अभिप्राय दिले नाहीत.**

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत पहिला अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, आवश्यकतेनुसार जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसुलीची रक्कम वसूल करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे आवश्यक ते प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. सदर बाबतीत विलंब होण्याची कारणे काय आहेत, अजून कार्यवाही करण्यास किती वर्षे जातील, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस विदित केले की, सन १९८९-९० पासून सन १९९५ पर्यंतची कामे असून. ही फार जुनी प्रकरणे आहेत. या प्रकरणातील बहुतांश कर्मचारी निवृत्त झाले आहेत, तर काही मयत झाले आहेत त्यामुळे या संदर्भात विलंब होत आहे. जिल्हा परिषदेच्या स्तरावरुन सर्व गट विकास अधिका-यांमार्फत बारकाईने पाठपुरावा सुरु आहे. काही तालुक्यांतील १०० टक्के वसुली झाली आहे तर उर्वरित तालुक्यांतील काही रकमा वसूल झाल्या असून पाठपुरावा सुरु आहे. पुढच्या ३ महिन्यात निश्चितपणे ती वसुली करण्यात येईल, जे कर्मचारी शोधता येण्याजोगे (traceable) आहेत त्यांची वसुली करण्यात येईल. काही जण निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून निवृत्तीवेतन नियमाप्रमाणे रक्कम वसूल करावी लागणार आहे. त्यांच्याकडून एकरकमी वसुली होणार नाही. १-२ कर्मचारी वगळता बहुतांश कर्मचारी निवृत्त झाले आहेत किंवा मयत झाले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००९-२०१० ची प्रकरणे आहेत. रु. ५,३१,०२४.६६ इतकी रक्कम वसूल करणे बाकी आहे. जिल्हा परिषदेने सदर रक्कमेच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस अशी माहिती दिली की, रु. ३,६८,६३६.२९ इतकी रक्कम वसूल झाली आहे. २८ प्रकरणांतील रु. ५,३१,०२४.६६ इतकी रक्कम वसूल करणे बाकी आहे. ११० ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी दोषी आहेत. त्यातील बरेच जण निवृत्त झाले आहेत. त्यांच्याकडून सेवानिवृती नियम १३४ अ प्रमाणे टप्प्याटप्प्याने कपात करुन वसूली करावी लागणार आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद वसुली आजपासून करणार आहे, मग अगोदर का केली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, रु. ३,६८,६३६.२९/- वसूल करण्यात आले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, किती वर्षे असे चालणार आहे, जे शिल्लक आहेत, त्यांच्या बाबतीत काय करणार आहात या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेत त्यांनी कार्यभार स्वीकारल्यापासून गटविकास अधिका-यांना सूचना दिल्या आहेत की, वसूली पूर्ण झाली पहिजे. त्यानुसार काहींची वसुली पूर्ण झाली आहे. उर्वरित गटविकास अधिकाऱ्यांना पुढील तीन महिन्यांत कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीचा अनुभव असा आहे की, समिती ज्या जिल्हा परिषदांमध्ये जाणार असते. तेथे जाण्यापूर्वीच ८-१५ दिवसांत सर्व वसुली झालेली असते. गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये १० वर्षे वसूली होत नाही हे योग्य नाही. पंचायती राज समिती भेट देणार असल्यामुळे नांदेड जिल्हा परिषदेमध्ये वसूली झाली होती. जिल्हा परिषदेचे स्पष्टीकरण योग्य नाही. मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या अधिपत्याखाली अधिकारी आहेत, त्यांच्याकडून ५ लाख रुपये वसुली होत नाही. जिल्हा परिषदेने ही वसुली महिन्याच्या आत केली जाईल असे समितीस आश्वासित करण्याऐवजी जिल्हा परिषद कार्यवाही करण्यास अजून वेळ मागत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस आश्वासित केले की, सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या संदर्भात अडचण येत आहे. सेवेत असणाऱ्या कर्मचा-यांची वसुली निश्चितपणे करण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ११० ग्रामसेवक गुंतले आहेत. सध्या ते सेवेत आहेत का ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस माहिती दिली की, फक्त २/३ ग्रामसेवक सेवेत आहेत, त्यांची वसुली एकरकमी करण्यात येईल. निवृत्त झालेल्यांची वसूली हळूहळू होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने त्यावेळी का कारवाई केली नाही, जिल्हा परिषदेने त्याच वेळी कारवाई केली पाहिजे होती. जिल्हा परिषदेने निवृत्तीच्या वेळी त्यांना " ना देय प्रमाणपत्र " का दिले, जिल्हा परिषदेने त्यांची निवृत्तीवेतनाची कागदपत्रे कशी मंजूर केली, जिल्हा परिषदेने त्यांची निवृत्तीवेतनाची कागदपत्रे मंजूर करण्याच्या अगोदर त्या संदर्भात तपासणी का केली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भात सूचना दिल्या आहेत की, ज्यांची वसुली आहे, त्यांनी सर्व रक्कम भरल्याशिवाय त्यांना " ना हरकत प्रमाणपत्र " देऊ नये.

उप सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला अधिक माहिती दिली की, जिल्हा परिषदांच्या प्रलंबित रकमांची वसुली करण्यात यावी असे दिनांक १३ मार्च, २०१७ ला परिपत्रक काढले आहे, त्यामध्ये या विषयाचाही अंतर्भाव केला आहे. यावर समितीने विचारणा केली की, शासनाने परिपत्रक काढले आहे हे बरोबर आहे. पण शासनाकडून " ना देय प्रमाणपत्र " कसे काय मिळाले हा विषय आहे. परिपत्रक म्हणजे विनंती किंवा सूचना असते. आपण अमुक असे करावे नाही तर आम्ही अमुक असे करु असे त्यामध्ये सांगितलेले असते. जिल्हा परिषदेने त्याच वेळी त्यांना अडविले पाहिजे होते. अगोदर २ हजार रुपये देय असलेली रक्कम भरणा केल्यावर निवृत्तीवेतन सुरु करण्यात येईल असे केले असते तर त्यांनी भरले असते. एखाद्या सन्माननीय सदस्यांनी विधानमंडळ सचिवालयातून घेतलेले एखादे पुस्तक परत केले नसेल तर ते पुस्तक परत केल्याशिवाय किंवा त्या पुस्तकाचे पैसे भरल्याशिवाय निवृत्तीवेतन सुरु होत नाही किंवा निवडणुकीचा फॉर्म देखील भरता येत नाही किंवा पुढच्या निवडणुकीला देखील उमेदवारी अर्ज भरता येत नाही. पुस्तकांची किंमत भरल्याशिवाय निवृत्तीवेतन सुरु होत नाही. जिल्हा परिषदेने अशी प्रक्रिया राबविली तर सर्व काही नीट चालेल. आपल्याच अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना सवलत दिली आहे. कारवाई करायची किंवा शिक्षा करायची हा दुसरा मुद्दा आहे, पण त्यांनी त्यांच्याकडील वसुली तरी भरली पाहिजे. निवृत्त होत असेल तर कारवाई करु नये. मात्र वसुली केली पाहिजे. कारण हे जनतेचे पैसे आहेत. जिल्हा परिषद/शासन त्या पैशांचे संरक्षक (कस्टेडियन) आहेत, पैसे वसूल केलेच पाहिजेत. यावर समितीने असे निदेश दिले की, २८ प्रकरणे प्रलंबित आहेत. जिल्हा परिषदेने तत्संदर्भात ताबडतोब कारवाई करावी. सेवेत असतील तर पगारातून वसूली करावी. त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. चुकीचे काम करणा-यांवर कारवाई केलीच पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी समितीला आश्वासित केले की, १ महिन्यात वसुली केली जाईल.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमाबाह्य बाबी या परिच्छेदाखालील जिल्हा परिषद, गोंदिया येथे रुपये ८,९९,६६१ रक्कम अपहाराच्या प्रकरणांमध्ये वसूल झालेले नव्हते. यासंदर्भात समितीने दिनांक ७ जानेवारी, २०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली, तेव्हा त्यांपैकी रुपये ६,२८,८६९ एवढी रक्कम वसुल होणे बाकी होते. तद्नंतर समितीने विभागीय सचिवांची साक्ष दिनांक २६ जून, २०१४ रोजी घेतली तेव्हा त्यापैकी ५.५२ लक्ष रुपयांची रक्कम वसुल करणे बाकी होते. समितीने आपल्या अहवालात अपहाराची रक्कम तात्काळ वसूल करुन त्याचा अहवाल समितीकडे पाठवावा अशी शिफारस केली होती, परंतु, दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या अनुपालनावरील साक्षीपर्यंत रुपये ५,३१,०२४.६६ एवढी रक्कम वसूल झालेली नव्हती.

समितीने शिफारस केल्यानंतरही केवळ २१,००० हजार रुपयांची अत्यल्प अशी रक्कम वसुल झालेली असल्याचे समितीला दिसून आले. अपहारात गुंतलेल्या रकमा समितीच्या शिफारशीनंतरही वसुल करण्यास गोंदिया जिल्हा परिषद प्रशासनाने चालढकल केल्याचे दिसून येत आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. अपहाराच्या प्रलंबित २८ प्रकरणांमध्ये सहभागी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांकडे वसुलपात्र रक्कम बाकी असूनही त्यांना निवृत्तीच्या वेळी प्रशासनाने ना-देय प्रमाणपत्र देणे किंवा त्यांचे निवृत्ती वेतनाचे प्रकरण मंजूर करणे समितीला अनाकलनीय वाटते. **सदरहू परिच्छेद सन २००९-१० या आर्थिक वर्षाचा असून यासंदर्भात अपचारी कर्मचाऱ्यांकडून अपहारात गुंतलेली रक्कम वसूल करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर आहे असे अधिकारी देखील अपचारी कर्मचाऱ्यांएवढेच जबाबदार आहेत असे समितीचे मत असून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच गोंदिया जिल्हा परिषदेअंतर्गत अपहाराची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून त्यात गुंतलेली व वसुल होण्यास बाकी असलेली ५,३१,०२४ रुपये वसुल करुन शासन खाती जमा करावी, त्याच प्रमाणे समितीने तिच्या अहवालात सदरची वसुली करण्यासंदर्भात निदेश देऊनही ज्या अधिकाऱ्यांद्वारा सदरची वसुली होण्यात दिरंगाई झाली अशा सर्व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीकडे विनाविलंब पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

# जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

## प्रकरण पाच

# जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

### मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविण्यासाठी अर्थसहाय्य (परिच्छेद क्र. ३.७८६) जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग सन २००८-०९ (परिच्छेद क्रमांक ०९)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या २० टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन वाटप करण्याची योजना राबविली असून त्यावर रक्कम रुपये ८९,५०५/- इतका खर्च केलेला आहे. सन २००८-२००९ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.०९) याबाबत लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे मुळ अभिप्राय व्यक्त केले होते.

(१) ग्रामपंचायत विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-१०८४/सीआर-१६३३/५७, दिनांक २१/०१/१९८५ व शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्र.पंरास-१०८४/सीआर-१६६३-५८७, दिनांक १९/०१/१९९५ नुसार लाभार्थी हिस्सा वसूल केल्याशिवाय लाभ देवू नये वा वस्तूची खरेदी करु नये असे असताना लाभ दिलेला आहे.

(२) वेंगुर्ले गटाकडील १७ व मालवण गटाकडील १ असे एकूण १८ शिलाई मशिन्सची १० टक्के प्रमाणे हिस्याची रक्कम लेखापरिक्षण कालावधी पर्यंत जमा नसल्याचे दिसून आले, त्यामुळे १८ लाभार्थ्यांची रुपये १३,७७०/- संबंधित गटांनी १० टक्के हिस्सा रक्कम जमा न करता वाटप केल्याने नियमबाह्यता झालेली आहे.

(३) योजनेतील १३० लाभार्थ्यांना शिलाई मशिन्स वाटप करण्यात आलेल्या असताना त्यांच्या वैयक्तिक पोहोच पावत्या पंजिकेसोबत ठेवलेल्या नाहीत.

(४) पुरवठा ठेकेदाराला दिलेल्या पुरवठा आदेशामध्ये सदरचा पुरवठा गटस्तरावर करावयाचा होता. जर शर्ती व अटीप्रमाणे गटस्तरावर पुरवठा करण्यात आला होता, तर विभागीय कार्यालयाचे साठा रजिस्टर पृष्ठ क्रमांक ७४ वर त्यांची नोंद का व कोणत्या हेतूने केली आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(५) गट स्तरावर वाटप केलेल्या शिलाई मशिन्सची तांत्रिकदृष्टया तपासणी केलेबाबत तांत्रिक अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त करुन घेतलेले नाहीत.

(६) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए-२०००/प्र.क्र.४१/३३, दिनांक १७ जानेवारी, २००१ अन्वये योजनेची निवड व अंमलबजावणीची रुपरेषा ३० जून पर्यंत अंतिम करणे आवश्यक असून लाभार्थ्यांची निवड व खरेदी प्रक्रिया ३० सप्टेंबर पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असताना तशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

(७) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.मागास/१०६३/प्र.क्र.१२३९/३४, दिनांक ०१ सप्टेंबर, १९९३ नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप करावयाचे आहे. तथापि प्रत्यक्षात शिलाई मशिन्सचे वाटप त्याच वर्षात (सन २००८-२००९) मध्ये झालेले नाही.

(८) सदर योजनेअंतर्गत महिलांना जर अर्थसहाय्य करणेचे होते तर संबंधित लाभार्थी महिलांना प्रत्यक्षात शिलाई मशिन्सची खरेदी का करुन देण्यात आली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(९) शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोबर, १९९९ मधील तरतूदीनुसार लाभार्थ्याचे नाव दारिद्र्य रेषेखालील कुटुंब यादीत असणे आवश्यक असताना त्याची नोंद मूळ मंजूर प्रस्तावात का करण्यात आली नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

वरील आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी स्वरुपात खुलासा कळविण्यात आला :-

(१) मंजूर केलेल्या लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यापूर्वी १०% लाभार्थी हिस्सा वसुल करुन साहित्य वाटप करणेत आलेले आहे व वसुल केलेली रक्कम जिल्हा परिषद खात्यात चलनाने जमा करणेत आलेली आहे.

(२) १०% लाभार्थी हिस्याची रक्कम लाभार्थ्यांकडून भरणा करुन घेऊन नंतरच साहित्य वाटप करण्यात आले आहे.

(३) शिलाई मशिन प्राप्त झाल्याबाबतची लाभार्थ्यांची पोहोच नस्ती सोबत ठेवणेत आलेली आहे.

(४) शिलाई मशिनचा पुरवठा आदेशानुसार गट स्तरावर करण्यात आलेला होता. तथापि विभागीय कार्यालयात एकत्रित नोंद साठा नोंदवहीत माहितीसाठी ठेवणेत आलेली होती.

(५) मशिन तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेबाबत जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण सिंधुदुर्गनगरी यांचेकडून तपासणी करुन घेणेत आलेली असून तपासणी अहवाल नस्ती सोबत जोडणेत आलेला आहे.

(६) सदरच्या योजनेचे प्रस्ताव तालुक्याकडून विहित मुदतीत प्राप्त होत नाहीत व सदर प्रस्तावांना समितीची मंजूरी असल्याने योजना अंमलबजावणीस विलंब झालेला आहे; तथापि भविष्यात याबाबतची दक्षता घेण्यात येत आहे.

(७) तालुका स्तरावर पुरवठा करण्याचे आदेश असल्याने साहित्य पुरवठा तालुकास्तरावर करण्यात येतो व तालुकास्तरावरुन साहित्य वाटपाबाबतचे नियोजन करुन साहित्य वाटप केले जाते, यापुढे वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(८) सदर योजनेचा उद्देश हा मागासवर्गीय महिलांना अर्थसहाय्य देणे असा नसून मागासवर्गीय महिलांचा स्वयंरोजगारातून आर्थिक स्तर उंचावणे असा असलेने त्यांना अर्थसहाय्य न करता स्वयंरोजगारासाठी शिलाई मशिन खरेदी करुन पुरविलेल्या आहेत.

(९) लाभार्थ्याने दारिद्र्य रेषेखालील असलेबाबतचा दाखला प्रस्तावासोबत जोडलेला असल्याने त्याची स्वतंत्र नोंद मुळ प्रस्तावात करण्याची आवश्यकता नाही.

समितीला उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे दिनांक १७ जुलै, २०१४ रोजी समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. सद्य:स्थितीमध्ये रेडीमेड कपड्यांची फॅशन आलेली आहे. त्यामुळे शिलाई मशिनचा वापर होत नाही असा ग्रामीण भागातील अनुभव आहे. त्यामुळे शिलाई मशिन देण्याबाबत शासनाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. आधुनिक पध्दतीने इलेक्ट्रॉनिक एम्ब्रायडरी किंवा अन्य बाबींचा समावेश करुन ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे यादृष्टीने या योजनांमध्ये बदल करण्याची गरज आहे असे समितीने साक्षीअंती मत व्यक्त करुन यासंदर्भात समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला पहिला अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.

" समितीला लेखी स्वरुपात प्राप्त झालेली माहिती, भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती विचारात घेता, जिल्हा परिषदेने महिलांना शिलाई मशिन पुरवितांना त्यांना पुराणकाळातील जुन्या मशीन न देता एम्ब्रॉयडरी व पिकोफॉल मशिन पुरविण्याबाबतचा महिला व बालविकास विभागाने दि.२४ जानेवारी, २०१४ मध्ये शासन निर्णय निर्गमित केल्याची बाब समिती समोर आली. तसेच जिल्हा परिषदांमार्फत कल्याणकारी योजनांकरिता लाभार्थ्यांसाठी जी खरेदी केली जाते ती दरकरारानुसार करण्यात येते. अशा खरेदीमध्ये बऱ्याच वेळा दरकरारानुसार खरेदी केलेल्या जादा मुल्याच्या पण निकृष्ट दर्जाच्या वस्तुपेक्षा कमी दरामध्ये चांगल्या दर्जाच्या वस्तु बाजारामध्ये उपलब्ध असूनही शासनाच्या दरकराराबाबत असलेल्या निर्णयांच्या बंधनामुळे बाजारातून खरेदी करता येत नाही. बहुतेक वेळा दरकरारानुसार खरेदी केलेल्या वस्तू कंत्राटदाराकडून खरेदी केल्या जातात, त्यांचा चांगला दर्जा राहतो असे नाही. तसेच बाजारात चांगल्या दर्जाच्या व स्पर्धा होईल या उद्देशाने सहज असा माल उपलब्ध होऊ शकतो.

सबब, सध्याच्या प्रचलित दरकरारात बदल करुन स्पर्धात्मक पध्दतीने निविदाद्वारा खरेदी करण्याबाबत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच महिला व बालविकास विभागाच्या दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजीचा शासन निर्णय हा एम्ब्रॉयडरी तसेच पिकोफॉल मशिन पुरविण्याबाबतचा जरी असला तरी त्यानुसार पुरवठा होत नाही असे दिसून येत आहे. सबब, उक्त शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन त्यानुसार खरेदीची कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीला देण्यात यावी.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेअंतर्गत समाज कल्याण विभागांतर्गत राखीव असलेल्या १०% निधीमधून ३३० लाभार्थ्यांना शिलाई मशिन्स उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. तथापि, त्या लाभार्थ्यांना वितरीत केल्याच्या पोचपावत्या लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध नव्हत्या. कारण लेखा परिक्षणाची पूर्वसूचना १ महिना आधी जिल्हा परिषदेस देण्यात येत असते. तथापि, त्यानंतरही त्या तपासणीसाठी उपलब्ध नसणे ही संशयास्पद बाब आहे असे समितीचे ठाम मत आहे. तेव्हा लेखा परिक्षणाच्या वेळी लाभार्थ्यांना दिलेल्या शिलाई मशिनच्या पोचपावत्या न दाखवणाऱ्या तत्कालिन अधिकारी / कर्मचाऱ्यांना तसेच हा अभिलेख वेळीच नस्तीत उपलब्ध न करुन देणाऱ्या संबंधितांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमाअंतर्गत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे. ”

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून एकूण १३० शिलाई मशिन लाभार्थ्यांना देणेसाठी पंचायत समिती स्तरावर पुरवठा करणेत आलेला होता. मात्र संबंधित लाभार्थी यांनी शिलाई मशिनच्या पोच पावत्या लेखा परिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत संबंधित कर्मचारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ कलम ३ नुसार सक्त ताकीद देण्यात येवून त्यांना याबाबत जबाबदार धरुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ कलम ३ नुसार पत्र क्र.सिंजिप/सकवि/योजना-१/पंरास/१२६६/२०१५, दि.१५ डिसेंबर, २०१५ अन्वये त्यांनी या पुढे अशी पुनरावृत्ती करु नये याची सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. त्यानुसार लेखा परिक्षकांनी आक्षेप नोंदविताना घ्यावयाची दक्षता तसेच लेखा परिक्षणाच्यावेळी कागदपत्रे सादर न केल्यास संबंधितांवर कारवाई करणेबाबतच्या शासनाच्या परिपत्रकान्वये सबंधितांवर रु.१००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे.

लाभार्थींच्या पोहोच व उपयोगिता प्रमाणपत्रे नस्ती सोबत उपलब्ध करुन ठेवण्यात आलेल्या आहेत.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-**

दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजीचा शासन निर्णय महिला व बालकल्याण विभागाचा नसून ग्राम विकास विभागाचा आहे. सदर शासन निर्णयाद्वारे सर्व जिल्हा परिषदांमध्ये कार्यवाही करण्यात येते. लेखा परिक्षणात कागदपत्र उपलब्ध करुन न दिल्याबद्दल संबंधितांना ताकीद देऊन दंडात्मक कारवाई केली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत पहिला अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविण्यासाठी अर्थसहाय्य या परिच्छेदाच्या अनुषंगाने अधिक माहिती द्यावी अशी सूचना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी समितीस विदित केले की, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून एकूण १३० शिलाई मशिन लाभार्थ्यांना देण्यासाठी पंचायत समिती स्तरावर पुरवठा करण्यात आला होता. मात्र संबंधित लाभार्थ्यांनी शिलाई मशिनच्या पोचपावत्या लेखा परिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ कलम ३ नुसार सक्त ताकिद देण्यात येवून त्यांना याबाबत जबाबदार धरुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ कलम ३ नुसार दिनांक १५ डिसेंबर, २०१५ अन्वये त्यांनी या पुढे अशी पुनरावृत्ती करु नये याची सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.  लेखा परिक्षकांनी आक्षेप नोंदविताना घ्यावयाची दक्षता

तसेच लेखा परिक्षणच्या वेळी कागदपत्रे सादर न केल्यास संबंधितांवर कारवाई करण्याबाबतच्या शासनाच्या परिपत्रकान्वये संबंधितांवर रु. १००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीने आपल्या शिफारशींमध्ये असे म्हटले होते की, याबाबतच्या शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन त्यानुसार खरेदीची कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे, त्यानुसार सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात आले आहे काय, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी कळविले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू प्रकरण सन २००८-२००९ मधील आहे, असे असताना यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी कळविले आहे याचा अर्थ समितीच्या साक्षीबाबतचे पत्र गेल्यानंतर यांनी ते कळविलेले आहे. सन २००८-२००९ च्या आक्षेपावर समितीने अशी शिफारस केली होती की, केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला ३ महिन्यांत कळवावे. मात्र प्रत्यक्षात समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे कामकाज का होत नाही, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला आश्वासित केले की, यापुढे याबाबत दक्षता घेण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीने शिफारस केल्यानंतर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी याबाबत १५ तारखेला कळविले आहे. दरम्यान एवढा कालावधी लोटलेला आहे. शासनाकडून ते या आधी का केले नाही, याची कारणे काय आहेत, यामध्ये दोषी कोण आहेत, याबाबत समितीला अवगत करावे. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते. तसेच समितीच्या म्हणण्याप्रमाणे संबंधितांनाही तसे कळविलेले आहे. शासन यापुढे दक्षता घेईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००८-२००९ मधील हे प्रकरण आहे. जिल्हा परिषदेने काही कारवाई केली नाही म्हणून हे प्रकरण पंचायती राज समिती समोर आले. तसेच समिती समोर झालेल्या चर्चेतूनही काही निष्पन्न झाले नाही, समितीला समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही. त्या एका वर्षात एवढे आक्षेप होते तर प्रत्येक वर्षी असे किती तरी आक्षेप असू शकतील. या साक्षीच्या निमित्ताने समितीला हे प्रतिपादन केले की, पंचायती राज समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे कारवाई केली पाहिजे, त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे ही अपेक्षा आहे. मात्र तसे होत नाही. यामध्ये दिरंगाई होत असेल, गांर्भीय नसेल तर समितीने विभागीय सचिवांची साक्ष कशासाठी घ्यायची हा प्रश्नच आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, १०० रुपयांचा दंड आकारल्याचेही नमूद केले आहे. गेली ७-८ वर्षे याबाबतीत काहीच झालेले दिसत नाही. सन २०१५ मध्ये ॲक्शन घेतल्याचे सांगितले आहे. लेक्षापरिक्षणाला पावत्या उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत, त्यामुळे खरोखरच मशिन्सचे वाटप झाले आहे की नाही, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी समितीस विदित केले की, १३० लाभार्थ्यांना शिलाई मशिन्सचे वाटप करण्यात आले होते. लेखा परिक्षणाच्या वेळेस पावत्या उपलब्ध करुन न दिल्याबद्दल नियमातील तरतुदीप्रमाणे १०० रुपयांचा दंड केलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने हा दंड कधी केला या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी समितीस माहिती दिली की, दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजी दंड केलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, २५ हजार रुपये इतक्या दंडाची तरतूद सन २०११ पासून सुरु करण्यात आली आहे. असे असतांना आपण सन २०१५ मध्ये १०० रुपयांचा दंड केला हे चुकीचे आहे. साक्षीच्या वेळेस पंचायती राज समितीस खोटी माहिती दिली जात आहे. सन २०११ मधील सुधारणेनुसार २५ हजार रुपये इतक्या दंडाची आकारणी करावयाची असताना १०० रुपये इतका दंड सन २०१५ मध्ये आकारलेला आहे याचे कारण काय आहे. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सन २०११ मध्ये १०० रुपयांऐवजी २५ हजार रुपये दंड करावा अशी दुरुस्ती अधिनियमात करण्यात आली. मात्र हे प्रकरण सन २००८-२००९ व सन २०१० मधील असल्याने त्यावेळेस जी दंडाची तरतूद होती, त्याप्रमाणे दंड आकारण्यात आलेला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, यामुळेच ज्या अधिकाऱ्यांनी हे केले त्यांच्या बाजूने जिल्हापरिषद उभी राहिली आहे असे दिसते. मागच्या काळात झालेल्या गुन्ह्यांची चौकशी आता केली तर, आता कोणते नियम लावणार, तेव्हा त्या गुन्ह्यांकरिता २ वर्षांची शिक्षा असेल तर त्याला २ वर्षांची शिक्षा करणार की, आताच्या नियमाप्रमाणे शिक्षा करणार, याबाबतचा खुलासा करावा या समितीच्या प्रश्नावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, त्यावेळेच्या नियमाप्रमाणे दंड आकारणी

करण्यात आली होती. शासन ही बाब तपासून घेईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, १० वर्षांपूर्वी एखाद्याने केलेल्या गुन्ह्यास त्यावेळेच्या नियमाप्रमाणे २ वर्षांची शिक्षा असेल मात्र तेव्हा त्या केसचा निकाल लागला नाही व दरम्यानच्या काळात त्या गुन्हयाकरिता फाशीची शिक्षा देण्याची तरतूद झाली तर, त्याला तुम्ही २ वर्षांची शिक्षा देणार की फाशीची शिक्षा देणार सन २००८-२००९ मधील प्रकरण असल्याने जिल्हा परिषद २५ हजार रुपयांऐवजी १०० रुपये दंड केल्याचे सांगत आहात. ही कारवाई त्याच वेळेस झाली असती तर हा आक्षेपच घेण्यात आला नसता. जिल्हा परिषदेने सन २००८-२००९ मध्येच ही कारवाई केली पाहिजे होती. पंचायती राज समितीने तेथे भेट दिली नसती तर हे प्रकरण निघाले देखील नसते ही बाब रेकॉर्डवर आली पाहिजे. समितीच्या अहवालामध्ये याची नोंद घेतली पाहीजे. कारण शेवटी शासनाचा कारभार नीट चालावा याकरिताच विधिमंडळाच्या समित्या आहेत. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, शासन ही बाब तपासून त्याप्रमाणे स्पष्टीकरणात्मक परिपत्रक निर्गमित करु. यावर समितीने अशी विचारणा केली की, शासनाने असे न सांगता या संदर्भात ठोस काही तरी सांगावे. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अधिनियमात दुरुस्ती केलेली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू वस्तू लाभार्थ्यांना खरोखरच वाटप केल्या आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी समितीस विदित केले की, होय सदरहू वस्तूंचे लाभार्थ्यांना खरोखरच वाटप करण्यात आले असून त्याबाबतच्या पोचपावत्या नस्तीमध्ये आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, लाभार्थ्यांना जे साहित्य द्यावयाचे आहे ते त्यांना मिळते का, हे पाहण्याची जबाबदारी केवळ पंचायती राज समितीची नाही तर ती प्रशासनाचीही जबाबदारी आहे. सदरहू वस्तू लाभार्थ्यांना दिल्या असतील तर त्याबाबतच्या पावत्या लेखापरिक्षणाला दाखविल्या पाहिजे होत्या, पंचायती राज समितीला त्याबाबत कळविले पाहिजे होते ते का कळविले नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यानी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेने ही बाब रेकॉर्डवर आणली असून या संदर्भात समितीला माहिती सादर करण्यात येईल. यावर समितीने पुढे विचारणा केली की, दंडाच्या रक्कमेसंदर्भात १०० रुपये की २५०००/- याचा खुलासा करावा. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला आश्वासित केले की, या संदर्भात शासन समितीला स्पष्टीकरण सादर करेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, २५ हजार रुपये दंड भरावा असे असताना देखील सन २००८ पासून दंड आकारण्यात आलेला नाही. सन २०११ च्या सुधारणेनुसार हा दंड आकारावा की, जुन्या नियमानुसार आकारावा हा प्रश्न आहे. १०० रुपयांऐवजी २५ हजार रुपये दंड झालेला आहे. यावर उप सचिव ग्रामविकास विभाग यांनी विदीत केले की, मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियमानुसार हा दंड केलेला आहे. त्यांच्याशी विचारविनिमय करुन स्पष्ट करण्यात येईल. पुढे समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणी २५ हजार रुपये दंड आकारावयाचा किंवा १०० रुपये दंड आकारावयाचा याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी याबाबतचा निर्णय दद्यावा. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, ज्या दिवशी निर्णय घेतला जातो त्या दिवशी जे नियम अस्तित्वात आहेत, त्याप्रमाणे कार्यवाही करावयास पाहिजे. जिल्हा परिषदेने शिक्षा केलेली आहे. ज्या दिवशी निर्णय घेतला त्या दिवशी जी शिक्षेची तरतूद होती, त्याप्रमाणे कारवाई करावयास पाहिजे. शासन यासंदर्भात विधी व न्याय खात्याचे मत घेऊ शकते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी समितीस विदित केले की, ज्यावेळी घटना घडते त्यावेळी असलेले नियम लागू झाले पाहिजेत. यावर समितीने निदेश दिले की, शासनाने या संदर्भात ८ दिवसांत विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय घ्यावेत.

## अभिप्राय व शिफारशी

मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन पुरविण्यासाठी जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी स्वःनिधीतून ८९,५०५/- रुपये इतका खर्च केला होता. त्यासंदर्भात सध्याच्या प्रचलित दरकरार पध्दतीत बदल करुन स्पर्धात्मक पध्दतीने निविदेद्वारे खरेदी करण्याबाबत विभागाने आवश्यक ती कारवाई करावी अशी समितीची शिफारस असूनही शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. सद्यस्थितीमध्ये दरकरारामध्ये नमूद केलेल्या वस्तुंपेक्षा चांगल्या दर्जाच्या व कमी किंमतीच्या वस्तू खुल्या बाजारामध्ये उपलब्ध असूनही शासनाच्या दरकराराबाबत असलेल्या निर्णयाच्या बंधनामुळे खुल्या

बाजारातून अशी खरेदी करता येत नाही. **समितीने निविदेद्वारा खुल्या बाजारातून वैयक्तिक लाभाच्या वस्तुंच्या खरेदीबाबत शिफारस करुनही शासनाने त्यावर कोणतेही भाष्य केलेले नाही याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. वस्तुत: शासनाने प्रचलित दरकरार खरेदी पध्दतीमध्ये असलेले दोष विचारात घेता संपूर्ण राज्यात दरकराराबाबत सुसूत्रता आणण्याकरीता सर्वंकष धोरण निश्चित करावे अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने बदलत्या काळानुरुप महिलांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना त्यात कालानुरुप बदल करण्याबाबत शिफारस केली होती. त्याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती देताना ग्रामविकास विभागाने दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी सुधारित शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०१३/प्र.क्र.७६/पंरा-१ **(परिशिष्ट ५.१)** निर्गमित केला होता, **परंतू सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्यरितीने होत नसल्याचे समितीला आढळून आले आहे. सदर शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करुन त्यानुसार खरेदीची कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस असूनही अनुपालनावरील साक्षीपर्यंत विभागाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही व समितीला कोणत्याही प्रकारची लेखी माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबाबत समिती नापसंती व्यक्त करते. समितीने शिफारस केल्याप्रमाणे उक्त शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन त्यानुसार खरेदीची कार्यवाही करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना अवगत करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेअंतर्गत खरेदी केलेल्या शिलाई मशिन्स लाभार्थ्यांना वितरीत केल्याच्या पोचपावत्या लेखापरिक्षणाचे वेळी उपलब्ध करुन दिलेल्या नव्हत्या, त्याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत समितीने शिफारस केली होती. परंतू सन २०११ मध्ये सदर अधिनियमात सुधारणा करण्यात येवून कलम ७ मधील १०० रुपये दंडाची तरतूद बदलून ती २५०००/- रुपये दंड अशी करण्यात आली. सन २००८-०९ या अहवाल वर्षात घडलेल्या गुन्ह्याला १०० रुपये दंड करावा किंवा सन २०११ मध्ये संबंधित अधिनियमात सुधारणा झालेली असल्यामुळे त्याला २५०००/- रुपये दंड करावा यावर ग्रामविकास विभागामार्फत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय समितीला प्राप्त झाले असून **(परिशिष्ट ५.२)** गुन्हा ज्या कालावधीत घडला त्या कालावधीत त्याकरीता जो दंड अस्तित्वात होता त्या दराने दंड आकारणे योग्य होईल अशा प्रकारचे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिलेले आहेत. **लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध करुन न देण्याबाबत आकारावयाच्या दंडाच्या रक्कमेबाबत संबंधितांची संदिग्धता दूर करण्यासाठी विधी व न्याय विभागाच्या सदर अभिप्रायानुसार स्वयंस्पष्ट सूचना विभागाने निर्गमित कराव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

**प्रकरण सहा**

## जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

### विमा व रॉयल्टीची रक्कम ठेकेदाराच्या देयकातुन वसूल न केल्याबाबत व बांधकामाच्या इतर अनियमिततेबाबत (परिच्छेद क्र.३.१४७) जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग सन २००९-१० (परिच्छेद क्र.४०)

बांधकाम उपविभाग, पंचायत समिती वैभववाडी यांनी सन २००९-१० मध्ये " अ-गट " रस्ते दुरुस्ती अनुदानातून एकूण १४ कामांवर रक्कम रुपये ३,००,३३९/- व १२ वा वित्त आयोगातून केलेल्या एकूण १८ कामावर रक्कम रुपये ८,७९,४०३/- असा एकूण रक्कम रुपये ११,७९,४७२/- इतका खर्च केलेला आहे. सन २००९-२०१० या वर्षाच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.४०) याबाबत लेखापरीक्षकांनी खालीलप्रमाणे मुळ अभिप्राय व्यक्त केले होते.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र.जिपर/२०००/प्र.क्र.८३७/३५, दिनांक ०८-०५-२००२ अन्वये कंत्राट कामाचा विमा शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविणे आवश्यक असतांना ठेकेदारांचे देयकातून विमा रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तरी रस्ते अ-गट एकूण १४ कामांवरील विमा रक्कम रुपये ३,१५०/- व १२ वा वित्त आयोग अनुदानातून केलेल्या १८ कामांची विम्याची रक्कम रुपये ९,२४३/- अशी एकूण रुपये १२,३९३/- वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय संकिर्ण/०२/०५/२९१/इमारती/दिनांक ११-०८-२००३ तसेच महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय गौण खनिज/ १०८८/४३३/३५९२/२-ब, दिनांक १८-१०-२००१ रोजीच्या निर्णयानुसार मक्तेदाराने रॉयल्टी भरणे आवश्यक असताना भरलेली नाही. तरी रस्ते गट-अ मधून केलेल्या कामावर वापरलेल्या साहित्याची रॉयल्टी रक्कम रुपये २,२७५/- व १२ वा वित्त आयोगामधून केलेल्या कामाची रॉयल्टी रक्कम रुपये १,८१२/- अशी एकूण रुपये ४,०८७/- रॉयल्टी ठेकेदारांकडून वसूल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

(३) अ-गट रस्ते दुरुस्ती अनुदानातून रस्ते दुरुस्ती, खड्डे भरणे अशी १४ कामे केलेली आहेत. कामाच्या मोजमाप नोंदवह्या तपासता एकूण रस्त्यांच्या लांबीपैकी कोणत्या कामातील चैनेल खड्डे बुजविले याबाबत पुस्तकामध्ये चैनेल नोंदविलेले नाहीत. मोघमपणे खड्डयांची मापे नोंदवून मुल्यांकन केलेले आहे.

(४) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय ग्रापापू १०९८/प्र.क्र.४२५/पापु, दिनांक ११-०१-१९९९ परिच्छेद क्रमांक ४० नुसार कामावर वापरलेली वाळू, खडी, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याची तपासणी शासकीय प्रयोगशाळा किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून तपासून घेऊन गुणवत्ता चाचणी अहवाल घेतलेला नाही.

(५) मांगवली जोडरस्ता खडीने भरणे कि.मी. ०० ते ३/०० या कामाची पत्रिका तपासता ठेकेदार सरपंच, ग्रामपंचायत मांगवली आणि करारपत्र, निविदा फॉर्म व देयकावर सह्या केलेल्या नसल्याचे आढळले. तरी कागदपत्र पूर्ण केलेली नसताना ठेकेदाराला रक्कम अदा केलेली आहे.

(६) रस्ते दुरुस्ती अ-गट मधील काम करुळ भट्टीवाडी रस्ता खड्डे भरणे कामाची पत्रिका तपासता ठेकेदाराच्या करारपत्रावर व निविदापत्रावर सह्या नाहीत. निविदा फॉर्मवर सही नसताना सदर निविदा मंजूर केलेली आहे. तसेच करारपत्रावर ठेकेदाराने सही केलेली नसताना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

(७) १२ वा वित्त आयोग अनुदानातून करण्यात आलेल्या रस्त्याची वापरलेली जमिन बक्षीस पत्राने संबंधित जमीन मालकाकडून जिल्हा परिषद, सिंधुदुर्गच्या नावे हस्तांतरित करुन घेतलेली नाही व रस्त्याची नोंद संबंधित ग्रामपंचायतीच्या नमुना नंबर २६ मध्ये केल्याबाबतची सत्यप्रत पंजिकेसोबत नाही.

(८) १२ वा वित्त आयोग मधील काम सडुरे बौध्दवाडी-चव्हाणवाडी रस्ता कॉक्रिंटकरण करणे, अंदाजपत्रकात बाब क्र. ३ नुसार कामावर फलक लावण्याची तरतूद केलेली असता ठेकेदार सरपंच, ग्रामपंचायत सडुरे- शिरोळे यांनी कामाच्या जागी फलक लावलेला नाही. शासन निर्णय पीव्हीएस/ १०९९/प्र.क्र.९९/०८, दिनांक १५-१०-१९९७ अन्वये फलक लावणे आवश्यक असताना फलक लावणेत आला नाही.

वरील आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली :-

(१) सदर मुद्यातील रस्ते अ-गट एकूण १४ कामावरील विमा रक्कम रुपये ३१५०/- व १२ वा वित्त आयोग अनुदानातून केलेल्या १८ कामांची विम्याची रक्कम रुपये ९२४३/- मिळून एकूण रक्कम रुपये १२३९३/- संबंधित ठेकेदाराच्या सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करणेत आलेली आहे.

(अ) पत्र क्र.पंसवै/अर्थ/रोखपाल/४९४५/२०१३, दि.०६-०३-२०१३ ने डी.डी.नं.२१०५८६/२५-०२-२०१३, रक्कम रु. २६००.

(ब) पत्र क्र.पंसवै/अर्थ/रोखपाल/४९४६/२०१३, दि.०६-०३-२०१३ ने डी.डी. नं.१४६८३२/२५-०२-२०१३ रक्कम रु. ७७४३/-

(क) पत्र क्र. सिंजिप/बांधकाम/उपअभि/जिपक/आस्था-३/अग.वि.मा./११३/२०१३, दि.०८-०५-२०१३ ने डी.डी.नं. ८९१८२६/२८-०३-२०१३ रोजीच्या रु.२४९१/- सोबत सदर पत्राची प्रत जोडणेत आलेली आहे.

(२) सोबतच्या परिशिष्टामध्ये नमुद केलेप्रमाणे रस्ते अ-गट मधून केलेल्या कामावर वापरलेल्या साहित्याची रॉयल्टी रक्कम रुपये २२७५/- व १२ व्या वित्त आयोग मधून केलेल्या कामांची रॉयल्टी रक्कम रुपये १,८१२/-अशी एकूण रॉयल्टीची रक्कम रुपये ४,०८७/- संबंधित ठेकेदारांच्या सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करण्यात आलेली असून मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग (खनिज विभाग) व तहसिलदार, वैभववाडी यांचेकडे,

(१) पत्र क्र.पंसवै/अर्थ/रोखपाल/४९३५/२०१३, दि.०६-०३-२०१३ ने डी.डी.पं.२१०५८७/-२५-०२-२०१३, रु. २२७५/-

(२) पत्र क्र.पंसवै/अर्थ/रोखपाल/४९३४/२०१३, दि.०५-०३-२०१३ ने डी.डी. पं.१४६८३३/२५-०२-२०१३, रु.१२१३/-

(३) पत्रक्र.सिंजिप/बांधकाम/अपअभि/जिपक/आस्था-३/गौण/११४/२०१३, दि. ०६-०५-२०१३ ने डी.डी. नं. ८५०६१०/८-०३-२०१३, रु. ५९९/- ने सादर करण्यात आलेले आहेत त्याची प्रत यालगत जोडणेत आलेली आहे.

(३) अ-गट रस्ते दुरुस्ती अनुदानातून १४ कामे रस्ते दुरुस्ती, खड्डे भरण्याची केलेली आहेत. कामांची अंदाजपत्रके करतेवेळी रस्त्यांच्या लांबीचे चैनेल नोंदवून करण्यात आलेली होती, त्यानुसार मोजमाप पुस्तकात कामाचे लांबीचे चैनेल नोंद करुन त्यानुसार कामाच्या मोजमाप पुस्तकांमध्ये चैनेल नोंद करण्यात आलेली आहे. त्याची सत्य प्रत सोबत जोडणेत आलेली आहे.

(४) सदरची कामे ही अ-१ फुटकळ स्वरुपाची असल्याने कामावरील साहित्याची चाचणी घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) मांगवली जोडरस्ता खडीने खड्डे भरणे कि.मी. ०/० ते ३/०० कामाची पंजिका तपासता ठेकेदार सरपंच, ग्रामपंचायत, मांगवली यांनी करारपत्र, निविदा फॉर्म व देयकावर सह्या अनावधनाने करुन घेण्याच्या राहिल्या. त्या आता सह्या करुन घेणेत आलेल्या आहेत. त्याची सत्य प्रत सोबत जोडणेत आलेली आहे.

(६) रस्ते दुरुस्ती अ-गट मधील काम करुळ भट्टीवाडी रस्ता खड्डे भरणे कामाची पंजिकेत ठेकेदार श्री.ए.एस.पाटील यांच्या करारपत्र व निविदा पत्रावर सह्या अनावधनाने करुन घेण्याच्या राहून गेल्या होत्या. त्या आता सह्या घेण्यात आलेल्या आहेत. त्याची सत्य प्रत सोबत जोडणेत आलेली आहे.

(७) १२ व्या वित्त आयोग अनुदानातून करण्यात आलेल्या सदर कामाच्या रस्त्यांची नोंद ग्रामपंचायतीच्या नमुना नं. २६ मध्ये नमुद असल्याने नमुना नं.२६ ची सत्यप्रत पंजिकेसोबत ठेवण्यात आलेली आहे. त्याची सत्य प्रत सोबत जोडणेत आलेली आहे.

(८) १२ व्या वित्त आयोग मधील काम सडुरे बौध्दवाडी चव्हाण-वाडी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, ठेकेदार सरपंच, ग्रामपंचायत सडुरे-शिराळे यांनी कामाच्या जागी सदर नामफलकाची नोंद प्रत्यक्ष फलक लावलेची खात्री करुन त्या प्रपत्राची सत्यप्रत पंजिकेसोबत ठेवण्यात आलेली आहे. त्याची सत्य प्रत सोबत जोडणेत आलेली आहे.

समितीने दिनांक १७ जुलै, २०१४ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे खालील (क) कंत्राटदाराकडून कामापोटी कापून घेण्यात आलेली विम्याची रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली आहे काय ? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत.

(ख) अशा प्रकारे राज्यात मार्च, २०१४ अखेरपर्यंत किती रक्कम विमा कंपनीकडे जमा करण्यात आली आहे,

(ग) अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे रस्ता वाहून गेला तर किंवा नादुरुस्त झाला तसेच कामगाराचा अपघात झाला तर विमा कंपनीकडून भरपाई मिळणे आवश्यक आहे काय,

(घ) अतिवृष्टीमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे रस्ता वाहून गेला किंवा कामगारास अपघात झाला असता अशा प्रकरणी विमा कंपनीने किती प्रकरणात नुकसान भरपाई दिली आहे, नुकसान भरपाई दिलेली नसल्यास त्याची कारणे काय आहेत.

मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागवून समितीने दिनांक १६ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला पहिला अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या :-

" सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, ग्रामीण भागातील बहुतांश रस्त्यांचा दर्जा खालावत चालला आहे. रस्त्याच्या कामामध्ये कंत्राटदारांनी एकूण कंत्राटाच्या १ टक्के रक्कम कामगार विम्यापोटी जमा करणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु, बऱ्याच वेळा अशाप्रकारे विम्याची रक्कम कंत्राटदार भरतच नाहीत. आणि जर भरली तर ती रस्त्याचे काम सुरु झाल्यापासून संपेपर्यंत एवढ्याच काळाकरिता कंत्राटदार विमा संरक्षण घेतात. परंतु, कंत्राटदाराने सुरु केलेले रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधी ऐवजी तो रस्ता नादुरुस्त होईपर्यंतच्या कालावधीचे विमा संरक्षण कंत्राटदाराकडून न घेतल्यामुळे त्या कालावधीत जर रस्ता खराब झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहत नाही. परिणामी राज्यातील बहुतांश रस्ते नादुरुस्त अवस्थेत दिसून येतात आणि त्याची जबाबदारी शासनावर येते. या संदर्भात समिती शासनास खालील शिफारशी करीत आहे.

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एखादी निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदाराला प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कामाचे कार्यादेश देण्यापूर्वी सदरहू कामास जेवढ्या कामगारांची आवश्यकता लागणार आहे. तेवढ्या कामगारांच्या विम्याची रक्कम कंत्राटदाराने शासनाकडे भरणे अनिवार्य करावे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करावयाचे काम जेवढा काळ सुस्थितीत राहणे आवश्यक आहे तेवढ्या काळासाठी त्या संपूर्ण कामाचा विमा संबंधित कंत्राटदाराने विमा संचालनालयाकडून उतरविणे अनिवार्य करावे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राज्यात मागील ५ वर्षात झालेल्या कामांमध्ये विम्याची किती रक्कम जमा झाली आहे व त्यातून विम्याचे किती दावे निकाली काढण्यात आले आहेत याची वर्षनिहाय माहिती तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावी.

(४) तसेच विम्याच्या प्रिमियम रकमेतील अखर्चित रक्कम रस्ते दुरुस्ती सुधार योजनेवर खर्च करण्याबाबत आदेश काढून ते सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी. "

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

(१) सदर शिफारशींच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, वित्त विभाग यांच्या दि.१९.०८.१९९१ च्या शासन निर्णयांन्वये शासकीय/निमशासकीय विभाग यांनी त्यांचे विविध योजनांबाबतचे कंत्राटीकामाचे विमा व्यवहार फक्त शासकीय विमानिधीकडेच करावेत असे निर्देश दिलेले आहेत. या अनुषंगाने विविध प्रकर्ता यांनी त्यांच्या कार्यादेशामध्ये विमा संचालनालयाकडे कंत्राटी कामाचा विमा उतरविण्याची अट अंतर्भूत केलेली आहे. विमा संचालनालयाचे मुख्यालय मुंबई येथे असून कार्यक्षेत्र राज्यात विखुरलेले आहे. सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध असलेली एजंट/ब्रोकर यांची सेवा या संचालनालयाकडे उपलब्ध नाही. तसेच, अत्यंत अपुऱ्या मनुष्यबळामध्ये विमा व्यवहार हाताळण्यात येतो, त्यामुळे शासकीय विमानिधीच्या कामकाजावर मर्यादा आहेत.

जे कंत्राटदार/प्रकर्ता या संचालनालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधतात, अशा कंत्राटदरांकडून विहित नमून्यातील विमा प्रस्ताव पत्र व विमा हप्ता प्राप्त झाल्यावर कंत्राटी कामाचा व ते काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांची विमा जोखीम स्वीकारण्यात येते. विमापत्रकाच्या अटी व शर्तीनुसार विमा दावे निकाली काढण्यात येतात.

(२) सदर शिफारशीच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, भारतीय विमा व्यवसायातील प्रचलित विमापत्रकाखाली कंत्राटी कामाचा विमा व्यवहार शासकीय विमा निधीमार्फत हाताळण्यात येतो. कंत्राटी कामाच्या प्रचलित प्रशुल्कानुसार कंत्राटी कामाचे विमापत्रकाखाली केवळ कंत्राटी कामाच्या कालावधीकरिता जोखीम स्वीकारण्याची तरतूद आहे. विमापत्रकामध्ये नमूद करण्यात आलेल्या कालावधी पूर्वी काम पूर्ण झाले किंवा कंत्राटी कामाचा काही भाग प्रकर्ता यांना हस्तांतरित केल्यास कंत्राटी कामाच्या विमापत्रकाच्या तरतूदीनुसार विमाकाराचे दायित्व समाप्त होते.

कंत्राटदाराने कंत्राटी काम विहित मुदतीत पूर्ण करुन ते प्रकर्ता यांना हवाली (Hand Over) केल्यानंतर सदर मालमत्तेची मालकी ही संबंधित प्रकर्ता यांची असते. हस्तांतरित झालेल्या मालमत्तेचा विमा उतरवावा किंवा कसे ? हे ठरविण्याचा अधिकार हा संबंधित प्रकर्ता यांचा आहे.

(३) सदर शिफारशीच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सार्वजनिक बांधकाम विभाग - सिंधुदुर्ग यांच्याकडून कंत्राटदाराच्या देयकातून कपात करुन विमा संचालनालयाकडे मागील ५ वर्षामध्ये जमा करण्यात आलेली रक्कम व प्रदान करण्यात आलेल्या विमादाव्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अनु.क्र. (१) | कालावधी (२) | कपात केलेली रक्कम (३) | प्रदान केलेले विमा दावे (४) |
|---|---|---|---|
| (१) | २००९-१० | २८,१३,१४०.०० | निरंक |
| (२) | २०१०-११ | ६०,०४,८९२.०० | निरंक |
| (३) | २०११-१२ | १,०४,३२,६८८.०० | निरंक |
| (४) | २०१२-१३ | ५७,३७,५५३.०० | निरंक |
| (५) | २०१३-१४ | ३१,०७,८४०.०० | निरंक |
| | एकूण रु. . . | २,८०,९६,११३.०० | निरंक |

(४) सदर शिफारशींच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, विमा संचालनालयामार्फत शासकीय/निमशासकीय विभागांना सर्वसाधारण विमासेवा पुरविण्याचे काम करण्यात येते. सदर कामकाज हे विमा अधिनियम, १९३८ च्या तरतूदीनुसार चालते. तसेच, प्रशुल्क सल्लागार समिती यांनी सर्वसाधारण विमा व्यवसायात विहीत केलेली विमापत्रकांच्या अटी व शर्तीनुसार विमा जोखीम स्वीकारणे व विमा दावे निकाली काढणे भारतीय विमाकारास बंधनकारक आहे. भारतीय विमा व्यवसायातील प्रचलित पध्दतीनुसार विमा संचालनालयामार्फत विविध विमापत्रकाखाली विमा जोखिम स्वीकारली जाते व त्या विमापत्रकाच्या अटी व शर्तीनुसार विमादावे निकाली काढले जातात. शासकीय/निमशासकीय विभागाकडून विमा हप्त्याच्या स्वरुपात जमा होणारी रक्कम शासकीय लेख्यांमध्ये जमा करण्यात येते. विमा संचालनालयाच्या व्यवस्थापनाकरिता प्रत्येक वर्षी राज्याच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात येते. वर्षाच्या शेवटी विमा हप्त्यापोटी प्राप्त झालेल्या रकमेतून प्रशासकीय खर्च, विमा दावे इ. खर्च वजा जाता शिल्लक रक्कम राज्याच्या एकत्रित निधीला वर्ग करण्यात येत असून ती राज्याच्या विकासासाठी उपयोगात आणली जाते. त्यामुळे या संचालनालयाकडे कोणत्याही प्रकारची विमाहप्त्यापोटी अखर्चित रक्कम शिल्लक राहत नाही हे येथे विनम्रपूर्वक नमूद करण्यात येत आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाही संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीची सहमती दर्शविणारे अभिप्राय नोंदविले.**

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत पहिला अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी समितीस विदित केले की, कंत्राटदाराने विम्याची रक्कम भरावयाची असून त्याने ही रक्कम न भरल्यास बिलातून कपात करुन ३० दिवसात सदर रक्कम भरणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केलेली आहे. तसेच सचिव, ग्रामविकास यांनी समितीस माहिती दिली की, नियमामध्ये अशी तरतूद आहे की, वर्कऑर्डर देण्याआधी विम्याची रक्कम भरावी. मात्र जोपर्यंत करार होत नाही, तोपर्यंत विम्याची रक्कम भरली जात नाही. कंत्राटदाराने रक्कम भरली नाही तर अशी तरतूद केली आहे की, जिल्हापरिषदेने ३० दिवसाच्या आत कंत्राटदाराच्या बिलामधून रक्कम कापून विमा संचालनालयाकडे जमा करावी. कंत्राटदाराच्या पहिल्या आर.ए.बिलामधून ही रक्कम वसूल करावयाची आहे. पहिल्या आर.ए.बिलातून ०.५० टक्के रक्कम विमा संचालनालयाकडे जमा करणे अनिवार्य आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, कंत्राटदाराने विम्याची रक्कम भरली नसेल व काम सुरु झाल्यावर अपघात झाला तर कामगाराला अशा वेळी कोणताही लाभ मिळत नाही. कामगाराला विमा संरक्षण मिळाले पाहिजे. यामुळे कंत्राटदाराने सुरुवातीलाच विम्याची रक्कम भरली पाहिजे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर विम्याची रक्कम भरावी असा नियम आहे. मात्र त्यावेळी जर विम्याची रक्कम भरली नाही तर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये विभागाची चूक नाही. मात्र नियमांमध्ये, निकषांमध्ये बदल करावा लागणार असेल तर शासनाने तसे सांगावे. ही समिती शिफारस करुन दुरुस्ती करु शकते. नियमांमध्ये ज्या काही त्रुटी किंवा दोष असल्यास दुरुस्त करता येतील. शासनाने अभिप्राय दिला पाहिजे. मात्र तशा प्रकारे अभिप्राय दिला जात नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, पहिल्यांदा विमा काढला पाहिजे असे परिपत्रकात नमूद केलेले आहे. यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, निविदा प्राप्त झाल्यानंतर त्वरित कामगारांचा विमा काढला पाहिजे. कंत्राटदाराने विमा काढला नाही तर जिल्हा परिषदेने पहिल्या बिलातून एकरकमी कपात करुन ती रक्कम विमा संचालनालयाकडे पाठवावी. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, करार झाल्याशिवाय विमा काढता येते ही समस्या आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करार केला जातो. करार झाल्यानंतर विम्याची रक्कम भरु असे कंत्राटदाराचे म्हणणे असते. त्याचे देखील म्हणणे बरोबर आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार आपले देखील म्हणणे बरोबर आहे. हा प्रश्न सोडविण्याकरिता काही मार्ग सुचवावा.

शिफारस क्रमांक १ संदर्भात संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस अशी माहिती दिली की, विमा संचालनालय यांनी पत्र दिलेले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, वर्क ऑर्डर दिल्यानंतर विम्याची रक्कम भरण्याची सूचना दिलेली आहे. जर कंत्राटदाराने विम्याची रक्कम भरली नाही तर पहिल्या बिलातून त्वरित एकरकमी रक्कम कापून विमा संचालनालयाकडे जमा करावी. यामुळे कामगारांना विम्याचे संरक्षण मिळू शकेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, काम मिळाल्यानंतर पहिल्या २ दिवसात अपघात झाला तर कामगारांना विम्याचे संरक्षण मिळत नाही. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने समिती सूचना देईल. वर्क ऑर्डर दिल्यानंतर विमा घेणे अनिवार्य केले पाहिजे. यामुळे काम करताना काही नुकसान झाले तर कामगारांना विमा मिळू शकतो. कंत्राटदाराने रक्कम न भरल्यास त्याच्या बिलातून वसुली करावी अशा दोन सूचना करण्यात याव्यात. निविदा मंजूर झाली, करार झाल्यावर लगेच कंत्राटदाराच्या बिलातून वसूली करावी. यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस विदित केले की, निविदा दिल्यानंतर काम सुरु करण्यासाठी विमा काढणे अनिवार्य आहे. त्याच वेळी विमा काढला तर कामगारांना विम्याचे संरक्षण पहिल्या दिवसापासून मिळू शकेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कंत्राटदाराकडून सुरक्षा ठेव घेतली जाते. वर्क ऑर्डर देतानाच विम्याची रक्कम घेतली पाहिजे, असे परिपत्रक शासनाने काढावे. यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस विदित केले की, कंत्राट करताना तशी अट ठेवली तरच ते शक्य आहे.

शिफारस क्रमांक २ संदर्भात संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, कंत्राटी कामावर काम करणा-या कामगारांचा विमा काढलेला असतो. तो विमा कंत्राट कामाच्या कालावधी पुरता मर्यादित असतो. एकदा सार्वजनिक बांधकाम विभागाला काम हस्तांतरित केल्यानंतर तो विमा संपुष्टात येतो. यानंतर विमा करावयाचा की नाही, हा निर्णय संबंधित विभागाचा असतो. समितीने विचारणा केली की, रस्त्याच्या कामासाठी विमा काढलेला असतो काय, यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, होय, कंत्राटदार केवळ कंत्राटी कामाच्या कालावधीकरिता विमा काढतो. पूर, वादळ, भूकंप आले तर त्याकरिता विमा असतो. मात्र कामाच्या गुणवत्तेसंदर्भात विमा नसतो. रस्ता पुरामुळे वाहून गेला तर विम्याचे संरक्षण मिळते. यावर समितीने विचारणा केली की, विभागाकडून विमा काढला जातो काय, यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस विदित केले की, होय, केंद्र शासनाचे काही महामार्ग आहेत. पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाकरिता विमा काढलेला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, साधारणपणे ज्या रस्त्याच्या कामासाठी बँकेचे कर्ज घेतले आहे, त्याकरिता विमा काढला जातो. यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस विदित केले की, विमा काढणे ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. त्यांनी विमा काढला नसल्यास त्यांना कळवावे. सार्वजनिक बांधकाम विभाग विमा काढू शकते. विमा संचालनालयाकडून विमा मिळू शकतो. यावर समितीने अशी विचारणा केली की, आतापर्यंत आपण नुकसान भरपाई दिली आहे काय, यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, होय, जेथे नुकसान झाले आहे, तेथे भरपाई दिलेली आहे. साधारणपणे कंत्राटी कालावधीत नुकसान भरपाई दिली जाते. या विम्यासाठी प्रिमियमची रक्कम दिली तरी ती शासनाच्याच तिजोरीत जमा होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कंत्राटी कामाच्या कालावधीमध्ये कंत्राटदार विमा काढतो. याकरिता त्याच्याकडून १ किंवा ५ टक्के रक्कम वसूल केली जाते. काही महामंडळांनी रस्त्याच्या कामासाठी विमा काढला आहे. उदा.एम.एस.आर.डी.सी. मात्र याप्रमाणे शासन कार्यवाही करीत नाही. कामगार हा महत्वाचा घटक आहे. कामगारांना इजा झाली तर कंत्राटदार भरपाई देत नाही. रस्त्याची देखभाल दुरुस्ती शासन स्वत: करीत असल्यामुळे विमा शासनाचा आहे. शासन रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी खर्च करते. पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून काम झाले तर त्या कामाची दुरुस्ती कोणाकडून केली जाते, या समितीच्या प्रश्नावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, दुरुस्तीचे काम कंत्राटदार करतो. पंतप्रधान ग्राम सडक योजनेमध्ये बांधकामाच्या दुरूस्तीची जबाबदारी कंत्राटदारावर निश्चित केली जाते.

शिफारस क्रमांक ३ संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, विम्याची रक्कम कशाकरिता कपात केलेली आहे, या समितीच्या प्रश्नावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, कामगार व काम या दोन्हीकरिता विम्याची रक्कम कपात केलेली आहे, मात्र कोणीही विम्याची मागणी केलेली नाही.

शिफारस क्रमांक ४ संदर्भात समितीने विचारणा केली की, विम्याच्या प्रिमियम रकमेतील अखर्चित रक्कम रस्ते दुरुस्ती सुधार योजनेवर खर्च करण्याबाबत आदेश काढून ते सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीने शिफारस केली होती. यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, विम्याच्या नियमानुसार प्रिमियम जमा केला जातो. प्रिमियमच्या माध्यमातून जमा होणारी रक्कम एकत्रित निधीत जमा केली जाते. कार्यालयाचा व्यवस्थापन खर्च भागविण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये तरतूद केली जाते. विमा हप्त्यापोटी प्राप्त झालेल्या रक्कमेतून प्रशासकीय खर्च, विमादावे इत्यादी खर्च वजा जाता शिल्लक रक्कम राज्याच्या एकत्रित निधीत वर्ग करण्यात येते. शासन त्या निधीचा विकास कामासाठी वापर करते. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ती रक्कम शासनाकडे जमा करण्याऐवजी रस्त्याच्या कामावर खर्च करावी. अर्थात हा धोरणात्मक निर्णय आहे. यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीला अशी माहिती दिली की, शासनाला पाहिजे त्या ठिकाणी ती रक्कम खर्च करु शकते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, विम्याची रक्कम त्याच कामासाठी खर्च करावी असे समितीचे मत आहे. यावर संचालक, विमा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, शासन केवळ रस्त्यासाठीच रक्कम घेत नसून कामगारांसाठी रक्कम घेतली जाते.

**अभिप्राय व शिफारशी**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, ग्रामीण भागातील बहुतांश रस्त्यांचा दर्जा खालावत चालला आहे. रस्त्याच्या कामामध्ये कंत्राटदारांनी एकूण कंत्राटाच्या १ टक्के रक्कम कामगार विम्यापोटी जमा करणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु, बऱ्याच वेळा अशाप्रकारे विम्याची रक्कम कंत्राटदार भरतच नाहीत आणि जर भरली तर ती रस्त्याचे काम सुरु झाल्यापासून संपेपर्यंत एवढ्याच काळाकरिता कंत्राटदार विमा संरक्षण घेतात. परंतु कंत्राटदाराने सुरु केलेले रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधी ऐवजी तो रस्ता नादुरुस्त होईपर्यंतच्या कालावधीचे विमा संरक्षण कंत्राटदाराकडून न घेतल्यामुळे त्या कालावधीत रस्ता खराब झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहत नाही. परिणामी, राज्यातील बहुतांश रस्ते नादुरुस्त अवस्थेत दिसून येतात आणि त्याची जबाबदारी शासनावर येते. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एखादी निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदाराला प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कामाचे कार्यादेश देण्यापूर्वी सदरहू कामास जेवढ्या कामगारांची आवश्यकता लागणार आहे, तेवढ्या कामगारांच्या विम्याची रक्कम कंत्राटदाराने शासनाकडे भरणे अनिवार्य करावे अशी समितीने शिफारस केली होती; परंतु, यासंदर्भात विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही याबाबत समिती नापंसती व्यक्त करते. याबाबत समिती अत्यंत गंभीर असून विभागाने समितीच्या शिफारशीवर अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यामुळे समितीचा अवमान झाला आहे असे समितीला वाटते. सदरची शिफारस ही कामगारास काम करतेवेळी अपघात झाल्यास त्याचा विमा उतरविण्याबाबत कंत्राटदाराकडून करारनामा करतानाच अटी व शर्तीमध्ये तसा उल्लेख करुन संबंधित कामगाराचा विमा उतरविणे आवश्यक असताना सदरची बाब केली जात नाही म्हणजे शासन कामगारांच्या जिविताबाबत अत्यंत उदासिन आहे. संविधानाने प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा अधिकार देऊन त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी शासनकर्त्यांवर ठेवली आहे. समितीने तिच्या अहवालात केलेली शिफारस हा संबंधित कामगारांच्या व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी केलेली असताना शासनाने याकडे दुर्लक्ष करणे हे अत्यंत गंभीर आहे.

**सबब, समितीने केलेली शिफारस कोणत्या स्तरावर प्रलंबित ठेवण्यात आली, यास जबाबदार कोण आहे याची चौकशी करुन त्या अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कार्यवाही प्रस्तावित करुन नियमानुसार कारवाई करावी व समितीने केलेल्या शिफारशी संदर्भात तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठवावी.**

## प्रकरण सात

# जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

### नेरुर कार्यात नारुर रस्ता डांबरीकरण तथा नुतनीकरण (परिच्छेद क्र. ३.१४८) जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग सन २००९-२०१० (परिच्छेद क्र. ५ (१))

बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी हस्तांतरित योजनेतून उपरोक्त कामाचे प्राकलन रक्कम रुपये १९,९८,९१८/- करुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देऊन ठेकेदारामार्फत सदरचे काम करुन घेऊन सदर कामावर रक्कम रुपये १९,१९,९१८/- खर्च करण्यात आलेली आहे. सन २००९-२०१० या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.५(१)) बाबत लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे मूळ अभिप्राय व्यक्त केले होते :-

(१) सदर रस्त्यावर ३ ठिकाणी आरसीसी पाईप बसवण्याचे काम प्राकलनाचे सर्वसाधारण वर्णनात नमुद असून त्याप्रमाणे मोजमाप नोंदवहीत झालेल्या कामाची नोंद आहे, तथापि, या जागी पूर्वी बसवलेले पाईप कार्यालयात जमा करुन त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

(२) देयकासोबत जोडलेल्या पूर्णत्वाच्या दाखल्यात सदरचे काम माहे मार्च, २०१० मध्ये पूर्ण झाल्याची कार्यकारी अभियंता/शाखा अभियंता व उप अभियंता यांच्या स्वाक्षरीसह नोंद आहे. तथापि मोजमाप नोंदवही पृष्ठ क्रमांक १८ वर दिनांक ३०-०३-२०१० रोजी कार्यकारी अभियंता यांनी आपले माहितीप्रमाणे काम झाले असल्याचे परंतु वाढत्या कामाच्या व्यापामुळे सदर देयकाची टक्केवारी तपासणी पुढील देयकात केली जाईल असा शेरा नोंदविला आहे. तरी सदरचे काम पूर्ण असताना व त्याप्रमाणे शाखा अभियंता व उपअभियंता यांनी तसा पूर्णत्वाचा दाखला दिला असताना कार्यकारी अभियंता यांनी टक्केवारी तपासणी केलेली नाही.

(३) कामासाठी वापरलेली खडी, डांबर यांचे चाचणी अहवाल हे मोजमाप तारखेनंतर घेतलेले आहेत.

वरील आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली.

(१) पूर्वी बसविणेत आलेले पाईप अतिजीर्ण व निरुपयोगी असल्याने पुन्हा वापरात येण्यायोग्य नव्हते. त्यामुळे सदर पाईप काढून टाकून, त्याठिकाणी नविन पाईप बसविण्यात आलेले आहेत.

(२) देयकासोबत पूर्णत्वाचे दाखले जोडण्यात आलेले होते. परंतु, कामाच्या व्यापामुळे पहाणी करता येत नसल्याने कार्यकारी अभियंता यांनी टक्केवारी तपासलेली नाही. सद्य:स्थितीत अंतिम देयक दिनांक २०-७-२०१३ रोजी खर्च घालणेत आलेले आहे.

(३) कामासाठी वापरलेली खडी, डांबर यांचे नमुने वेळेवर तपासणीसाठी पाठविणेत आलेले होते. त्यांचेकडील कामाच्या व्यापामुळे अहवाल विलंबाने या कार्यालयाकडे प्राप्त झालेले होते. अहवाल प्राप्त न झालेने पहिल्या देयकातून रु. १,००,०००/-एवढी रक्कम सुरक्षा अनामत ठेवण्यात आलेली होती. सद्य:स्थितीत काम सुस्थीतीत असून, आता कपात केलेली रक्कम अदा करणेत आलेली आहे.

समितीने दिनांक १७ जुलै, २०१४ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी कामासाठी वापरलेली खडी, डांबर यांचे नमुने वेळेवर तपासणीसाठी पाठविण्यात आले होते, डांबरामध्ये फर्नेस ऑईल मिक्स केलेले असते व त्यामुळे रस्त्याचा दर्जा चांगला राहत नाही. डांबरात कोणते पदार्थ मिक्स केलेले आहेत याबाबतचे पृथ:करण करण्यासाठी आपल्या राज्यात गुणनियंत्रण प्रयोग शाळा नाही. आपल्याकडे केवळ डांबराची तपासणी करुन त्याची ग्रेड ठरविली जाते. पूर्वी करण्यात आलेले रस्ते आजही सुस्थितीत आहेत, परंतु आता जे रस्ते तयार केले जातात ते ३-४ महिन्यातच उखडतात. त्याचे कारण डांबरामध्ये मिक्सींग केलेले असते. त्यामुळे आपल्या राज्यातही अशा प्रकारची अत्याधुनिक प्रयोग शाळा नसल्याने आपल्याकडे त्याचा फक्त दर्जा निश्चित केला जातो. त्याचे पृथ:करण करण्याची सुविधा उपलब्ध नाही असे समितीने प्रतिपादन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे (ख) डांबरामध्ये कोणते पदार्थ मिसळले आहेत याची तपासणी करण्यासाठी राज्यात प्रयोगशाळा आहेत काय, (ग) डांबरातील भेसळ तपासण्याकरिता राज्यात अत्याधुनिक प्रयोगशाळा निर्माण करण्याबाबत राज्याचे धोरण काय आहे, (घ) डांबरामध्ये फर्नेस ऑईलची भेसळ होवून रस्त्याचा दर्जा चांगला राहत नाही, हे खरे आहे काय, या मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागवून दिनांक १६ जून, २०१५ रोजी संबंधित विभागाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस माहिती देताना, राज्यात जवळपास ५० हजार कोटी रुपयांची रस्त्यांची कामे केली जातात, परंतु डांबरात भेसळ आहे की नाही हे तपासण्यासाठी कोठेही प्रयोगशाळा नाही. याची तपासणी तिऱ्हाईकाकडून करुन घेतली पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात अशा प्रकारची गुणनियंत्रण प्रयोगशाळा सुरू करण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी शासनाने तातडीने उपाययोजना करावी असे समितीने मत प्रतिपादन केले.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुले, २०१५ रोजी आपला पहिला अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या :-

“ सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती विचारात घेता समितीच्या असे निदर्शनास आले की, राज्यात हजारो कोटी रुपयांची रस्त्याची कामे केली जातात. तथापि, डांबरातील भेसळ तपासण्यासाठी राज्यात कोठेही प्रयोगशाळा नाही, त्यामुळे तयार करण्यात आलेल्या रस्त्यांचा कामाचा दर्जा निकृष्ट असल्याने त्यावर खड्डे पडून माणसांना व वाहनांना सतत अपघात होत असतात व त्यामुळे जीवित व वित्त हानीही होत असते. त्याच प्रमाणे शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असतो. विशेषतः ग्रामीण भागातील डांबरी रस्ते प्रवासासाठी सुरक्षित नाहीत. कारण राज्यातील डांबरी रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबरात फर्नेस ऑईल आणि रॉकेल यांची भेसळ केलेली असल्यामुळे त्याद्वारे तयार केलेले रस्ते निकृष्ट दर्जाचे व तकलादू असतात. सबब, डांबरातील भेसळ तपासणे व रस्त्यांचा दर्जा चांगला राहावा यासाठी समिती खालील प्रमाणे शिफारशी करीत आहे.

(१) केंद्र शासनाच्या ३ ऑईल कंपन्यांचेच डांबर विकत घेणे तसेच या पुढील काळात शासकीय कंत्राटदारांवर उक्त कंपन्यांचे खरेदी देयक जोडणे अनिवार्य करण्यात यावे.

(२) रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी (साईटवर) डांबर तपासण्यासाठी फिरत्या (मोबाईल) प्रयोगशाळा निर्माण करुन, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय महाविद्यालयातूनच डांबराची गुणवत्ता तपासणी करणे अनिवार्य करावे अथवा प्रत्येक जिल्ह्यात दर्जा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा व त्याद्वारे डांबर तपासणी वेळोवेळी करण्यात यावी.

(३) ज्या रस्त्याचे डांबरीकरण झाले आहे त्या रस्त्यावरील डांबरीकरणाची स्थिती व त्याची तपासणी कुठे केली इ. तपशील उक्त रस्त्याच्या दर्शनी भागावर एका लोखंडी फलकावर लावून परिसरातील जनतेला रस्त्याच्या कामाची डांबरीकरणाच्या साहित्य तपासणीची माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य करावे.

(४) राज्यातील रस्त्याचे काम कंत्राटातील मुदतीपूर्वी खराब / निकृष्ट दर्जाचे झाल्यास संबंधित कंत्राटदार व संबंधित अभियंत्यांवर जबाबदारी (defect liability) निश्चित करण्यात यावी,

(५) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये (PMGSY) ज्याप्रमाणे रस्त्याची गुणवत्ता व दर्जा चांगला राहावा यासंबंधाने तरतूदी आहेत, त्या सर्व जशाच्या तशा राज्यातील रस्त्यांच्या कंत्राटामध्ये देखील लागू करण्यात याव्यात.

उर्वरित शिफारशी विचारात घेऊन एकच सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी. ”

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

**(**१) पुर्वी खात्यामार्फत कंत्राटदारास कामासाठी लागणारे साहित्य (सिमेंट, लोखंड व डांबर) इत्यादी पुरवठा केले जात होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन परिपत्रक क्र.एसटीआर-१०९५/५७९१२/प्र.क्र.७८/का.बा.सा., मंत्रालय, मुंबई, दिनांक १६-५-१९९६ नुसार तशा पध्दती रद्द करुन कामासाठी लागणारे साहित्य स्वतः आणावे अशा प्रकारची तरतूद नमूद आहे. शासन निर्णयानुसार देयकासोबत डांबर खरेदीच्या देयकाची प्रत सोबत जोडण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) जिल्हा परिषदेकडील कामावर वापरले जाणारे डांबराची तपासणी PMGSY प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रयोगशाळेतून केली जाते. तसेच कामाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास अशा कामांची तपासणी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत कार्यान्वीत असलेल्या राज्य गुणवत्ता नियंत्रकांमार्फत तपासणी करुन घेण्यात येते.

(३) रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावरील डांबर तपासणी कोठे केली याबाबतची माहिती रस्त्याच्या दर्शनी भागावर लोखंडी फलकाद्वारे लावण्याबाबत या कार्यालयाने पत्र क्र.सिंजिप/ बांध/भांडार-१/पंरास/२३३२/२०१५, दि. ९-९-२०१५ ने सर्व उपअभियंता व शाखा कार्यालयांना निर्देशित केले आहे.

(४) दोष दायित्व कालावधीत काम खराब झाल्यास त्याची जबाबदारी पूर्णपणे कंत्राटदाराची राहते तसेच केलेले काम खराब झाल्यास व दोष दायित्व कालावधीमध्ये संबंधित कंत्राटदारावर योग्य ती कारवाई करण्यात येते.

(५) रस्त्याची गुणवत्ता व दर्जा चांगला राहावा यासाठी PMGSY च्या तरतूदी प्रमाणे गुणवत्तेची चाचणी करण्यात येते. त्याच प्रमाणे शासन निर्णय दिनांक १० सप्टेंबर, २०१२ मधील ८ ब नुसार राज्य गुणवत्ता नियंत्रक यांचेकडून कामांची तपासणी करुन घेतली जाते.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीची सहमती दर्शविणारे अभिप्राय नोंदविले.**

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत पहिला अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. केंद्र शासनाच्या ऑईल कंपन्यांचेच डांबर विकत घेणे तसेच यापुढील काळात शासकीय कंत्राटदारांवर उक्त कंपन्याचे खरेदी देयक जोडणे अनिवार्य करण्यात यावे अशी समितीची शिफारस होती. यावर सचिव, ग्रामविकास विभाग (रस्ते) यांनी समितीस अशी माहिती दिली की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जी कार्यपध्दती अनुसरली जाते, त्याप्रमाणेच ग्रामविकास विभागाने धोरण स्वीकारलेले आहे. समितीने शासनास शिफारस केल्याप्रमाणे शासन निर्णय निर्गमित केलेला आहे की, यापुढे जिल्हा परिषदांनी शासन मान्य सरकारी कंपन्यांकडूनच डांबर खरेदी करावे.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, शासनाचे म्हणणे आहे परंतु ऑईल कंपन्यांकडून डांबर खरेदी न करता अन्य कंपन्यांकडून डांबर खरेदी करुन रस्त्यावर केवळ ऑईल ओतले जाते, त्यामुळे रस्त्याचा दर्जा चांगला राहत नाही असा आक्षेप आहे. पूर्वी कंत्राटदारास कामासाठी लागणारे डांबर खात्यामार्फत पुरविले जात होते, परंतु शासनाने ती पध्दत बंद करुन कंत्राटदाराला स्वतः डांबर विकत घेण्यास परवानगी दिली. कंत्राटदाराने शासकीय कंपन्यांकडून डांबर विकत घ्यावे अशी तरतूद आहे, परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही या संदर्भात उत्तर अपेक्षित आहे. जिल्हा परिषदेकडून समितीला भेटी व बैठकांच्या वेळी अधिका-यांकडून योग्य उत्तर प्राप्त न झाल्यामुळे हा परिच्छेद साक्षीसाठी आलेला आहे. शासनाने

केलेल्या कार्यवाहीच्या रकान्यात " सहमत आहे " असे नमूद केले आहे याचा अर्थ काय आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग (रस्ते) यांनी समितीस विदित केले की, साक्ष होण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्या समवेत चर्चा करुन लेखी उत्तर समितीला सादर केले जाते. समितीला जी शिफारस केलेली आहे त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने पूर्तता केलेली आहे. शासनाने दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी या संदर्भात शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

समितीने अशी पुढे आणखी विचारणा केली की, कामासाठी लागणारे साहित्य कंत्राटदाराने स्वतः आणावे अशा प्रकारची तरतूद आहे. शासन निर्णयानुसार देयकासोबत डांबर खरेदीच्या देयकाची प्रत जोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत असे लेखी उत्तरात नमूद केलेले आहे, परंतु जिल्हा परिषदेने जे या नियमांची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे एक वाक्य लेखी उत्तरात नमूद करणे आवश्यक होते. यावर सचिव, ग्रामविकास विभाग रस्ते यांनी समितीस विदित केले की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक ३ महिन्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडून डांबर खरेदीबाबत आढावा घ्यावयाचा आहे आणि त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावयाची आहे. समितीच्या निदेशानुसार डांबराची प्रत तपासून घेण्यात यावी. सन २००४ चा शासन निर्णय ग्राम विकास विभागाला देखील लागू केलेला आहे. शासनाने समितीच्या सूचनेप्रमाणे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी परिपत्रक काढले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासन मान्य कंपन्यांकडूनच डांबर खरेदी करावे असे निर्देश दिलेले आहेत काय ? यावर सचिव, ग्रामविकास विभाग (रस्ते) यांनी समितीस विदित केले की, शासनाच्या तीन ऑईल कंपन्या आहेत. त्यांनी शासनाच्या तीन कंपन्यांकडूनच डांबर खरेदी करावयाचे आहे. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, अधिकृत डांबर उत्पादकांकडूनच डांबर खरेदी करावे अशा शासनाने सूचना दिलेल्या आहेत. कंपनीकडून मिळालेला मूळ गेट पास असेल तरच रेकॉर्डमध्ये नोंद घ्यावयास पाहिजे. अन्य कंपन्यांना डांबर विकण्याचा अधिकार नाही. भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि इंडियन ऑईल या तीन शासकीय कंपन्या आहेत. अन्य कंपन्यांकडून डांबर खरेदी केले तर त्यामध्ये शंभर टक्के भेसळ असते. समजा १० टन डांबर खरेदी केले तर त्याचे २० टन डांबर करुन ते वापरले जाते. त्यामुळे रस्त्याचा दर्जा खराब होतो. शासनाच्या तीन कंपन्यांकडून डांबर खरेदी केले पाहिजे असा शासन निर्णय आहे. कंपनीचा मूळ गेटपास असल्याशिवाय बिल पास करु नये. यावर सचिव, ग्राम विकास (रस्ते) विभाग यांनी समितीस विदित केले की, शासनाने दिनांक १२ एप्रिल, २०१७ च्या शासन निर्णयामध्ये त्याचा अंतर्भाव केलेला आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, रस्त्यांच्या कामासाठी चांगल्या दर्जाचे डांबर वापरले जात नाही, त्यामुळे रस्ते ३ महिन्यात खराब होतात. रस्त्यावर ऑईल टाकले जाते. यासंदर्भात जिल्हा परिषदेला सूचना द्याव्यात. यावर सचिव, ग्राम विकास (रस्ते) विभाग यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००९-२०१० या वर्षात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी हस्तांतरीत योजनेतून नेरुर कार्यात नारुर रस्ता डांबरीकरण तथा नुतनीकरणाचे काम केले होते. सदरहू कामासाठी वापरलेले खडी व डांबर यांचे चाचणी अहवाल हे मोजमाप तारखेनंतर घेतले असल्याचा आक्षेप लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालात लेखापरिक्षकांनी घेतला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने राज्यातील रस्त्यांच्या कामात वापरण्यात येत असलेल्या डांबरातील भेसळीमुळे रस्ते निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत केंद्र शासनाच्या तीन ऑईल कंपन्यांचे डांबर विकत घेणे तसेच या पुढील काळात शासकीय कंत्राटदारांवर उक्त कंपन्यांचे खरेदी देयक जोडणे अनिवार्य करण्यात यावे इत्यादी शिफारशी केल्या होत्या.

समितीच्या शिफारशी विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१९/यं.बा.सा. **(परिशिष्ट ७.१)** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामांसाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या डांबराच्या चलनाची खातरजमा करण्याबाबत परिपत्रक निर्गमित केले. तसेच ग्रामविकास विभागातील प्रधानमंत्री ग्रामसडक व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्यांच्या कामांसाठी शासनाच्या अंगिकृत असलेल्या

तेल रिफायनरीमधून डांबर प्राप्त करुन घेणे व प्राप्त डांबराच्या चलनाची खातरजमा करण्याबाबत शासन परिपत्रक क्रमांक ग्रासयो २०१७/प्र.क्र.७९/योजना-९, दिनांकित ९ मे, २०१७ **(परिशिष्ट ७.२)** निर्गमित केले आहे. समितीच्या शिफारशीनुसार शासनाने तातडीने परिपत्रक निर्गमित केल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

**“ राज्यातील डांबरी रस्त्यांच्या कामांची गुणवत्ता वाढावी व ती कामे दर्जेदार व्हावीत याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बांधकाम विभागाअंतर्गत रस्त्यांच्या विविध प्रकारच्या डांबरीकरणाच्या कामासाठी डांबराचे प्रापण शासन अंगिकृत तेल कंपन्यांच्या रिफायनरीकडूनच करणे यापुढील काळात अनिवार्य करण्यात आले आहे. प्रत्येक महिन्याभरात केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने वापरलेल्या डांबराची चलने व मोजमाप पुस्तिकेतील नोंदी यापुढील काळात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासन अंगिकृत तेल रिफायनरीकडे त्या महिन्यातील पंधरा तारखेपर्यंत तपासून घेतल्यामुळे तेल कंपनीने नाकारलेली/डांबराची खोटी चलने वापरुन कंत्राटदाराने केलेले काम संबंधित विभागाकडून नाकारण्यात येवून त्यापोटी झालेल्या खर्चाची देयके अदा करण्यात येवू नये अशा सूचना उक्त परिपत्रकाद्वारे देण्यात आलेले आहे. अशा प्रकारे खोटी चलने वापरुन देयके अदा केलेली आढळल्यास संबंधित कार्यकारी अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित करुन संबंधित कंत्राटदाराविरुध्द फौजदारी कारवाई करण्याची देखील सदर परिपत्रकात सूचित करण्यात आलेले आहे, याबाबत समिती समाधान व्यक्त करते. ”**

# परिशिष्ट “अ”

## शासनाचे आदेश व परिपत्रके

**(परिशिष्ट १.१)**

राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना देय
असलेल्या रजा प्रवास सवलती संदर्भातील
तरतूदींमध्ये सुधारणा करणेबाबत..........

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः रप्रस-१११४ / प्र.क्र. ११ /सेवा-५
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १० जून, २०१५

वाचा :-

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक :टीआरए-११६३/२७२६-V, दि.२३ ऑक्टोबर, १९६३
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : टीआरए-११६४/९४/II/५, दि.३ जून, १९६४
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: टीआरए-११८०/सीआर३१८/एससीआर-५, दि.०९ सप्टेंबर, १९८०
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए-११८१/सीआर५७७/८१/एससीआर-५, दि.१६ एप्रिल, १९८१
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक प्रवास-१०८८/सीआर३३४/सेवा-५, दि.३० जून, १९८८
६) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक प्रवास-११८९/२५५/सेवा-५, दि.२५ सप्टेंबर, १९८९
७) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक रप्रस-११९४/१८४/सेवा-५, दि.२८ मार्च, १९९५
८) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०००/प्र.क्र.७०/सेवा-५, दि.११ ऑगस्ट, २०००
९) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०००/प्र.क्र.७०/सेवा-५, दि.१० फेब्रुवारी, २००१
१०) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक रप्रस-११०६/प्र.क्र.७७/सेवा-५, दि.०६ डिसेंबर, २००६
११) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि.३ मार्च, २०१०

प्रस्तावना :-

राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना वरील संदर्भ क्र.१ व ७ वरील शासन निर्णयानुसार, स्वग्राम रजा प्रवास सवलत व महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आलेली असून यासंदर्भातील तरतूदींमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त अ.क्र.२) येथील स्पष्टीकरणानुसार, रजा प्रवास सवलतींतर्गत करण्यात येणारा वातानुकूलीत वर्गाच्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती, प्रथम वर्गाच्या भाड्याशी सीमित करुन देण्याबाबत विहित करण्यात आलेले आहे. तथापि, सद्यस्थितीत राज्यातून धावणाऱ्या बहुतांशी रेल्वे गाड्यांमध्ये प्रथम वर्ग अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच कुटुंबाच्या व्याख्येत अविवाहितांचा विचार करणे गरजेचे ठरल्याने, तसेच, या संदर्भातील उपरोक्त संदर्भ १ ते १० क्रमांकाच्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण करण्याच्या दृष्टीने रजा प्रवास सवलतीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मुख्यालयापासून त्यांच्या स्वग्रामी जाण्यासाठी चार वर्षाच्या एका गटवर्षात दोन स्वग्राम किंवा एक महाराष्ट्र दर्शन व एक स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. सदर सवलतीच्या अनुषंगाने खाली नमूद केल्यानुसार अटी व शर्ती एकत्रितपणे विहित करण्यात येत आहेत :-

१) स्वग्राम - स्वग्राम म्हणजे कर्मचाऱ्याचे कायम वास्तव्याचे ठिकाण किंवा त्याच्या सेवापुस्तकात नोंदविलेले गांव किंवा योग्य त्या कारणास्तव घोषित केलेले अन्य ठिकाण ( मालकीची स्थावर मालमत्ता, जवळच्या नातेवाईकांचे म्हणजे आई-वडिल, भाऊ यांचे कायम वास्तव्याचे ठिकाण ) कर्मचाऱ्याच्या मुख्यालयापासून त्याने घोषित केलेल्या स्वग्रामी जाण्यासाठी ही सवलत असल्याने यासाठी राज्यात किंवा राज्याबाहेर प्रवासाच्या अंतराची मर्यादा असणार नाही. मात्र शासन सेवेत दाखल झाल्यापासून सहा महिन्याचे आत कर्मचाऱ्याने स्वग्राम घोषित करणे बंधनकारक आहे. या कालमर्यादेत स्वग्राम घोषित केल्यास त्या कर्मचाऱ्याला आपल्या सेवाकाळात एकदा स्वग्राम बदलण्याची संधी राहील. विहित कालमर्यादेनंतर स्वग्राम घोषित करण्यात आल्यास "स्वग्राम घोषणा" अंतीम राहील. स्वग्राम घोषणा नियंत्रक अधिकाऱ्यांनी स्विकारण्यापूर्वी अथवा संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्याची सलग एक वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी ही सवलत अनुज्ञेय ठरणार नाही.

२) महाराष्ट्र दर्शन - राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यास सदर सवलत अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. ही सवलत राज्याच्या भौगोलिक सीमेच्या आत अनुज्ञेय आहे. ही सवलत उपभोगताना किमान व कमाल अंतराच्या प्रवासाची अट नाही. परंतु सदर सवलतीचे ठिकाण रजेच्या अर्जाद्वारे घोषित करणे तसेच प्रवास सुरू करण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्याची पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे.

३) कुटूंबाची व्याख्या - स्वग्राम / महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीसाठी कुटूंबियात केवळ पती किंवा पत्नी व पूर्णपणे अवलंबित असलेली दोन अपत्ये तसेच आईवडील किंवा विधवा महिला अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी दोन अपत्ये तसेच सासूसासरे यांचा समावेश असेल तथापि अधिकारी / कर्मचारी अविवाहित असेल तर महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतींतर्गत त्यावर अवलंबित आई- वडिल व अवलंबित अविवाहीत अज्ञान भाऊ व बहीण यांचेसमवेत सदर सवलत उपभोगता येईल. तथापि याबाबत आई वडील व भाऊ आणि बहीण यांचे रेशनकार्ड कर्मचाऱ्याच्या पत्त्यावरील असणे आवश्यक राहील

i) दि.१ मे, २००१ पासून केवळ पती / पत्नी व दोन हयात अपत्यांच्या कुटूंबालाच ही सवलत लागू असेल.

ii) दि.३० एप्रिल, २००१ रोजी दोनपेक्षा अधिक हयात अपत्ये असतील व त्यांची संख्या नंतर वाढली नसेल तरच अशा कुटूंबास या सवलतीचा लाभ अनुज्ञेय असेल.

iii) दि.३० एप्रिल, २००१ रोजी एकही हयात अपत्य नसलेल्या किंवा एकच हयात अपत्य असलेल्या कर्मचाऱ्याच्या कुटूंबातील हयात अपत्यांची संख्या वरील तारखेनंतर एकाच प्रसूतीमुळे दोनपेक्षा अधिक होत असली तरीही ही सवलत अनुज्ञेय ठरेल.

४. <u>रजेचा कालावधी</u> - सदर सवलतीसाठी कर्मचाऱ्यास रजेच्या कालावधीची मर्यादा असणार नाही. तथापि अल्प रजेत अथवा लागून असलेल्या सार्वजनिक सुट्टयांमध्ये स्वग्रामी जाऊन आल्यास हा लाभ देय राहील. परंतु यासाठी संबधित नियंत्रक अधिकाऱ्याची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक आहे. या प्रयोजनासाठी रजेमध्ये परिवर्तीत रजा, अर्जित रजा, प्रसुती रजा, सरासरी अर्धवेतनी रजा, असाधारण रजा यांचा समावेश असेल.

५. शासकीय कर्मचारी व त्याच्या कुटूंबातील सदस्यांना एकत्र किंवा वेगळयाने, त्यांच्या सोयीनुसार प्रवास करता येईल. तसेच प्रतिपूर्ती दावा एकमेकांच्या प्रवासावर अवलंबून राहणार नाही. कुटूंबियांना ही सवलत देय ठरविताना शासकीय कर्मचारी रजेवर असेल किंवा नसेल याचा संबंध असणार नाही. परंतु कुटूंबियांना परतीचा प्रवास जाण्याच्या प्रवास दिनांकापासून सहा महिन्याच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे. हा परतीचा प्रवास ज्या गटवर्षात असेल त्याच गटवर्षात गणला जाईल. तसेच ज्या कर्मचाऱ्याचे कुटूंब कामाच्या ठिकाणापासून दूर राहत असेल व शासकीय कर्मचारी व त्याचे कुटूंबिय दोन वर्षातुन एकदा या सवलतीचा लाभ घेऊ शकत नसल्यास तो एकटा कर्मचारी प्रत्येक वर्षी एकदा ही सवलत उपभोगण्यास पात्र राहील. तसेच अशा कर्मचाऱ्यास महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्या गटवर्षात केवळ एक स्वग्राम व एक महाराष्ट्र दर्शन सवलत उपभोगता येईल.

६. <u>गटवर्ष</u> - या सवलतीसाठीच्या पहिल्या गटवर्षाची सुरुवात १ जानेवारी, १९९३ पासून झाल्याचे समजण्यात यावे. त्यामुळे हया गटवर्षाची गणना १९९३-९६, १९९७-२०००, २००१-०४,……… अशी पुढे चालू राहील. या प्रवास सवलतीच्या चार वर्षाच्या एका गटवर्षात दोन म्हणजेच दोन वर्षाच्या एका उपगटवर्षात एक याप्रमाणे स्वग्राम रजा सवलतींचा लाभ अनुज्ञेय राहील अथवा एका उपगटवर्षात एक स्वग्राम रजा प्रवास सवलत व दुसऱ्या उपगटवर्षात एक महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीचा लाभ अनुज्ञेय राहील. शासकीय कर्मचाऱ्याने सदर सवलत त्या त्या उपगटवर्षात उपभोगणे आवश्यक आहे. मागील उपगटवर्षात न घेतलेली रजा प्रवास सवलत पुढील उपगटवर्षाच्या ३१ डिसेंबर पर्यंत उपभोगणे आवश्यक राहील. त्यांनतर व्यपगत होऊन अनुज्ञेय ठरणार नाही.

७. <u>दोघेही पती-पत्नी शासकीय सेवेत असल्यास</u> - ही सवलत दोहोंपैकी एकालाच कुटूंबियासह उपभोगता येईल. तसेच या सवलतीखालील प्रवासखर्चाची मागणी करताना देयकासोबत शासकीय सेवेतील पती अथवा पत्नीकडून या सवलतीचा लाभ घेतला नसल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

८. भारताबाहेर स्वग्राम असल्यास - शासकीय कर्मचाऱ्याचे स्वग्राम भारताबाहेर असले तरीही ही सवलत अनुज्ञेय आहे. परंतु स्वग्राम घोषणा नियंत्रक अधिकाऱ्याने स्विकृत केली असली पाहिजे. प्रवासखर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात रेल्वे किंवा जलवाहनाचा विचार करता जवळच्या मार्गाने कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेल्या वर्गाच्या भाड्याशी सिमीत करुन प्रतिपूर्ती देय राहील.

९. प्रवास अग्रीम - या प्रवास सवलतींसाठी अग्रीम अनुज्ञेय आहे. परंतु या अग्रीमाची मर्यादा या तरतूदींखाली उपलब्ध अदांजित अर्थसहाय्याच्या रकमेच्या ४/५ एवढे उपलब्ध होईल. शासकीय कर्मचारी व त्याचे कुटूंबिय यांनी स्वतंत्रपणे प्रवास सवलत उपभोगण्याचे ठरविल्यास वेगवेगळे अग्रीम देय राहील. परंतु ते प्रमाण देयतेवर अवलंबून असेल. तसेच स्वग्रामी जाण्याच्या व परतीच्या प्रवासातील अंतर तीन महिन्यांपेक्षा ( ९० दिवस ) अधिक असल्यास केवळ जाण्याच्या प्रवासासाठी अग्रीम देय राहील.

जेव्हा परतीच्या प्रवासाचा अग्रीम मंजूर झाला असेल, परंतु शासकीय कर्मचारी किंवा त्याच्या कुटूंबियाचा स्वग्रामी मुक्काम तीन महिन्यांपेक्षा ( ९० दिवस ) अधिक होत असल्याचे स्पष्ट झाले असेल तर ½ अग्रीम ताबडतोब परत करणे आवश्यक आहे.

या सवलतीखाली जाण्याचा प्रवास १५ दिवसांच्या आत सुरु करणे शक्य न झाल्यास प्राप्त अग्रीम ताबडतोब परत करणे आवश्यक आहे. तसेच परतीच्या प्रवासानंतर एक महिन्याच्या आत प्रवास भत्ता दावा पारित होणे आवश्यक आहे.

१०. स्वियेतर सेवेत असतांना रजा प्रवास सवलत - शासकीय कर्मचारी जर स्वियेतर सेवेत असेल तर त्या कर्मचाऱ्यास या तरतूदीखाली रजा प्रवास सवलत घेता येते, तथापि ही बाब त्याच्या स्वियेतर नियुक्तीच्या आदेशांत नमूद करणे आवश्यक आहे. मात्र या सवलतीवरील खर्चाचे दायित्व स्वियेतर नियोक्त्याचे राहील.

११. अनुज्ञेय वाहन प्रकार

| अ.क्र. | शासकीय अधिकारी/कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | रेल्वे प्रवास | जलमार्गाने प्रवास | सडकमार्गाने |
|---|---|---|---|---|
| १ | अ) रू.८९००/- व त्याहून अधिक | वातानुकुलित प्रथम वर्ग /वातानुकुलित २ स्तर | उच्चतम वर्ग | वातानुकूलीत बससहीत इतर सर्व सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |
| | ब) रु.६६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८९००/- पेक्षा कमी | वातानुकुलित २ स्तर / प्रथम वर्ग / वातानुकुलित खुर्चीयान | | |

| अ.क्र. | शासकीय अधिकारी/कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | रेल्वे प्रवास | जलमार्गाने प्रवास | सडक मार्गाने |
|---|---|---|---|---|
| २ | रु.४४०० ते रु.६५९९/- | प्रथम वर्ग/ वातानुकुलित ३ स्तर / वातानुकुलित खुर्चीयान / द्वितीय वर्ग शयनयान | दोन वर्गामधील वरचा, तीनमधील मधला व चारमधील दुसरा | वातानुकूलीत बसखेरीज इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |
| ३ | अ) रु.४२०० ते रु.४३९९/- | अ) वातानुकुलित खुर्चीयान / द्वितीय वर्ग शयनयान | अ) दोन वर्गामधील खालचा, तीनमधील मधला व चारमधील तिसरा | सर्वसाधारण सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |
| | ब) रु.४२००/- पेक्षा कमी | ब) द्वितीय वर्ग शयनयान | ब) निम्नतम वर्ग | |

टीप :- १) ३ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांना अर्धे तिकीट अनुज्ञेय आहे.

२) या प्रवास सवलतीसाठी आराम गाडीचा प्रवास अनुज्ञेय असल्यास व अशी आरामगाडी १२ वर्षाखालील मुलांसाठी पूर्ण तिकीट आकारत असल्यास पूर्ण तिकीटाचा प्रवासखर्च अनुज्ञेय राहील.

३) दोन ठिकाणे रेल्वेमार्गाने जोडलेली असल्यास रेल्वेनेच प्रवास करणे आवश्यक आहे. त्यामुळे आरामगाडीने केलेल्या प्रवासखर्चाची प्रतिपूर्ती रेल्वेच्या अनुज्ञेय वर्गाच्या भाड्याशी सीमित करुन देय राहील.

४) या सवलतींतर्गत खाजगी व स्वत:च्या मालकीच्या वाहनाने केलेल्या प्रवासखर्चाची प्रतिपूर्ती संबंधित कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेल्या रेल्वे/ सार्वजनिक वाहनाच्या भाड्याशी सीमित करुन देय राहील.

५) रजा प्रवास सवलतीसाठी आरक्षण शुल्क देय राहील.

६) रजा प्रवास सवलत उपभोगल्यानंतर प्रवासखर्चाचे देयकांसोबत रेल्वे / बसची ति कीटे सादर करणे बंधनकारक राहील.

(७) विमानप्रवास अनुज्ञेय नसलेल्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना या पुढे स्वग्राम रजा प्रवास सवलत/रजा प्रवास सवलती अंतर्गत, रेल्वेने जोडलेल्या ठिकाणांदरम्यानचा प्रवास सार्वजनिक /खाजगी विमान कंपन्याच्या विमानांनी करता येईल. मात्र, यासाठी संबंधितास रेल्वेच्या (राजधानी/शताब्दी एक्सप्रेस वगळून अन्य गाड्यांच्या ) अनुज्ञेय वर्गाचे भाडे व विमान प्रवासाचे भाडे यापैकी कमी असलेल्या रकमेची प्रतिपूर्ती मंजूर करण्यात येईल. या विषयीचा दावा सादर करतांना, विमानाचे तिकीट/बोर्डींग पास आणि तिकीटावर प्रवासाचे भाडे नमूद केलेले नसेल तर कर्मचाऱ्याने /अधिकाऱ्याने भरलेल्या भाड्याची रक्कम दर्शविणारी संबंधित विमान कंपनीची पावतीही सोबत जोडावी लागेल.

१२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ ( सन १९६२ चा अधिनियम, क्र.५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन, जिल्हा परिषदांच्या ज्या कर्मचाऱ्यांना सदर रजा प्रवास सवलत लागू आहे, त्यांना ह्या शासन निर्णयातील तरतूदी योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

१३. रजा प्रवास सवलतीचा लाभ घेणाऱ्या व त्यांना सदर सवलत मंजूर करणाऱ्या अनुक्रमे कर्मचारी / अधिकारी यांचेकडून संगनमताने खोटी बीले सादर करुन, मंजूर करुन घेतल्याचे आढळल्यास, कडक शिक्षेस पात्र राहतील.

१४. या योजनेवरील खर्च, "स्वग्राम रजा प्रवास सवलत" यासाठी खर्ची घालण्यात येणाऱ्या संबंधित प्रमुख लेखाशिर्षाखालील ज्या लेखाशिर्षाखाली त्याच्या सहायक अनुदानाचा खर्च, खर्ची घालण्यात येतो, त्या उपलेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येईल. यापूर्वी सुरू झालेला प्रवास किंवा निकाली काढलेल्या प्रकरणांचा नव्याने विचार करण्यात येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०६१०१३१३०६४२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Devidasrao Londhe

Digitally signed by Shrikant Devidasrao Londhe
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Shrikant Devidasrao Londhe
Date: 2015.06.10 13:16:21 +05'30'

( श्री. दे. लोंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव,

२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

३) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
४) सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य
५) सर्व मंत्रालयीन विभाग,
६) मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील सर्व विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख,
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
८) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
९) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०) *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
११) *प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१४) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१५) राज्य महिला आयोग, मुंबई
१६) सर्व विभागीय आयुक्त,
१७) सर्व जिल्हाधिकारी
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१९) महासंचालक, यशदा, पुणे
२०) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
२१) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
२२) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
२३) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२७) सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नार्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
२८) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
२९) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं., योगक्षेम समोर, वसंतराव गवस चौक, नरीमन पॉईट, मुंबई २० (५ प्रती)
३०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४ (५ प्रती)
३१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५ प्रती)

३२) इंडीयन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)

३३) नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई२१ (५प्रती)

३४) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २५ (५ प्रती)

३५) वित्त विभागातील सर्व कार्यासन,

३६) निवडनस्ती, वित्त विभाग/सेवा-५,

- पत्राने

# (परिशिष्ट २.१)

राज्य लोकसंख्या धोरण-पशुसंवर्धन विभाग

महाराष्ट्र शासन

[illegible] पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

शासन निर्णय क्रमांक [illegible]

दिनांक [illegible] २००२

| |
|---|
| पशुसंवर्धन विभाग |
| [illegible] |
| [illegible] |
| [illegible] शासन |
| [illegible] विधानसभा |

पहा:- शासन निर्णय [illegible] आरोग्य विभाग क्र. [illegible] २००० [illegible]

प्रस्तावना :-

राज्यात [illegible] लोकसंख्येवर [illegible] परिस्थितीचा विचार करुन राज्याचे [illegible] लोकसंख्या धोरण [illegible] आवश्यक आहे. त्यामुळे राज्य शासनाने [illegible] राज्य लोकसंख्या धोरण जाहीर केलेले आहे. [illegible] आणि [illegible] अंमलबजावणी [illegible] खालील प्रमाणे निर्णय शासनाने घेतला आहे.

शासन निर्णय :-

पशुसंवर्धन विभागातर्फे शेतकऱ्यांच्या हितासाठी [illegible] महत्वाच्या योजना आहेत.

१) रोजगार/स्वयंरोजगार निर्मिती कार्यक्रमातील
   १. [illegible] गट वाटप.
   २. [illegible] गट वाटप.
   ३. [illegible] गट वाटप.
   ४. [illegible] गट वाटप.
२) अनुसूचित जाती/नवबौद्ध लाभार्थिंना दुधाळ जनावरांचे गट वाटप.
३) अनुसूचित जाती/नवबौद्ध लाभार्थिंना दुधाळ शेळ्यांचे गट वाटप.
४) आदिवासी लाभार्थिंना दुधाळ जनावरांचे गट वाटप.
५) आदिवासी लाभार्थिंना शेळ्यांचे गट वाटप.
६) [illegible] विकास [illegible] योजने अंतर्गत दुधाळ [illegible] पुरवठा [illegible]
७) विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम.

[illegible]

[illegible] अंमलबजावणी [illegible] लाभार्थ्यांना [illegible] पशुसंवर्धन [illegible] प्रचलित [illegible] [illegible] लाभ मिळत [illegible] सर्वांना लागू करण्यात येत आहे.

२. वैयक्तिक लाभार्थ्यांना [illegible] निश्चित करण्यात [illegible] आदेश व शर्ती [illegible] कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरीत/-
(के.पी. [illegible])
[illegible] सचिव, महाराष्ट्र शासन,
[illegible] पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

* * * * * * * * * * * * * * *

क्रमांक पशुसंवर्धन-१०/[illegible]/२००३/प्रस-८
आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे कार्यालय
दिनांक : १०/०९/२००३

प्रति,
१. प्रादेशिक पशुसंवर्धन सहसंचालक (सर्व)
२. जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक (सर्व)
३. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

[illegible] पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार लाभार्थींची निवड करण्यात यावी [illegible]

[illegible]
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ करिता

[illegible] पशुसंवर्धन [illegible]

प्रत माहितीकरिता :
१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२. [illegible] जिल्हा [illegible] (सर्व)
प्रत [illegible]
१. [illegible] पशु-१ ते २५ यांना
[illegible]

## (परिशिष्ट २.२)

पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत, राज्य स्तरीय आणि जिल्हा वार्षिक योजनांमधील वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत केवळ छोटे कुटुंब असलेल्या लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन परिपत्रक क्र. पंरास-२०१४/प्र.क्र. १५३/पदुम-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ फेब्रुवारी, २०१७.

वाचा - १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०२०००/प्र.क्र.२१२/पदुम-४, दि. १३.०८.२००३.

२ .सामान्य प्रशासन विभागाची अधिसुचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा, दि. २८.०३.२००५.

प्रस्तावना -

वाचा-१ येथील शासन निर्णयान्वये "राज्य लोकसंख्या धोरण-पशुसंवर्धन विभाग" निर्गमित करण्यात आलेला असून, त्याअन्वये लहान कुटुंब या संकल्पनेचा पशुसंवर्धन विभागातील वैयक्तिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी स्वीकार करण्यात आलेला आहे. वाचा-२ येथील अधिसुचनेन्वये लहान कुटुंबाचे स्पष्टीकरण (एक) एखाद्या जोडप्यास हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर केवळ एकच मूल असेल त्याबाबतीत नंतरच्या एका प्रसुतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल. तसेच, (दोन) "मूल" यामध्ये दत्तक मुलाचा किंवा मुलांचा समावेश होत नाही. याबाबींचा समावेश करून सर्वसमावेशक शासन परिपत्रक निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने, खालीलप्रमाणे शासन परिपत्रक निर्गमीत करण्यात येत आहे.

शासन परिपत्रक-

पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत, राज्यस्तरीय आणि जिल्हा वार्षिक योजनांमधील वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र लाभार्थ्यांना छोटे कुटुंबाच्या अनुषंगाने खालील अटी व शर्ती लागू करण्यात येत आहेत.

१) फक्त छोटे कुटुंब (पती-पत्नी यासह दोन मुले) संकल्पना अवलंबिणाऱ्या जोडप्यांना यापुढे पशुसंवर्धन विभागाच्या विविध वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत मिळणाऱ्या अर्थसहाय्यास (सबसिडीज) पात्र समजण्यात यावे.

२) दि. ०१.५.२००१ नंतर तिसरी संतती झालेली असेल किंवा होईल तर असे लाभार्थी पशुसंवर्धन विभागामार्फत विविध वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

३) छोटे कुटुंब या अटीमुळे ज्या ठिकाणी दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी उपलब्ध होत नसेल त्या ठिकाणी लाभार्थी निवडताना छोटे कुटुंब ही अट लागू करण्यात येऊ नये.

४) एखाद्या जोडप्यास दि. २८.०३.२००५ रोजी किंवा त्यानंतर केवळ एकच मूल असेल त्याबाबतीत नंतरच्या एका प्रसुतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल.

५) "मूल" यामध्ये दत्तक मुलाचा किंवा मुलांचा समावेश होत नाही.

पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्र पुरस्कृत, राज्यस्तरीय आणि जिल्हा वार्षिक योजनांमधील वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरीता विहित करण्यात आलेल्या इतर अटी व शर्ती यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसून सदर अटी शर्ती यापुढेही तशाच कायम राहतील.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०२०४१४५६५५९६०१ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

Shashank Madhav Sathe

Digitally signed by Shashank Madhav Sathe

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध पुणे-०७.
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला
५. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे.
६. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व)
७. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, (सर्व)
८. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
९. निवड नस्ती (पदुम-४)

**(परिशिष्ट ५.१)**

जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या
महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या
योजनांबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः झेडपीए २०१३/प्र.क्र. ७६/पंरा-१
बांधकाम भवन, तळमजला
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक : २४ जानेवारी, २०१४

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांकः झेडपीए २०१०/अनौसंक्र.३३/प्र.क्र.१६८/पंरा-१, दिनांक १० मार्च २०११.
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः झेडपीए २०१०/अनौसंक्र.३३/प्र.क्र.१६८/पंरा-१, दिनांक २२ जुलै, २०११.
३) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः झेडपीए २०१२/३८१/प्र.क्र. ८२/पंरा-१, दिनांक १६ जून, २०१२.
४) शासन निर्णय क्रमांकः झेडपीए २०१२/९८७/प्र.क्र. २०० /पंरा-१, दिनांक १३ मार्च, २०१३.
५) शासन परिपत्रक क्रमांकः झेडपीए २०१३/प्र.क्र. ०७/पंरा-१, दिनांक २१मार्च, २०१३.

शासन निर्णय -

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीने राबवावयाचे कार्यक्रम/योजना संदर्भाधिन शासन निर्णयानुसार राबविण्यात येतात. तथापि या योजनांमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनाच्या निदर्शनास आल्याने संदर्भाधिन सर्व शासन निर्णय, शुध्दीपत्रक व परिपत्रकांचे एकत्रिकरण करुन सुधारित आदेश पारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महिला व मुलींना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बाल कल्याण समित्यांमार्फत जिल्हा परिषद उत्पन्नाचे १० टक्के निधीतून खालील योजना सक्षमपणे राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. निधी व शासकिय अनुदानातुन, पंचायत समितीनी पंचायत समिती उत्पन्नाचे १० टक्के मधून व ग्रामपंचायतींनी ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे १० टक्के निधीमधून खालील योजना सक्षमपणे राबविण्यासाठी यापुर्वीचे शासन निर्णय, शुध्दीपत्रके व परिपत्रके अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**गट "अ" प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजना :-**

**१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण :-**

महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणासाठी सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणाच्या योजना राबवाव्यात. केंद्र शासनाचे उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण, कौशल्य वृध्दी उपक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम इ. योजने अंतर्गत व त्यांचे मार्फत प्रशिक्षण आयोजित करावे. व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर व कोर्सची माहिती www.sdi.gov.in & www.dget.nic.in/mes या वेबसाईटवर उपलब्ध आहे. व्यक्तीमत्व विकास, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, केटरींग, बेकिंग अशा विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन, फुड प्रोसेसिंग, शिवणकाम व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण, संगणक दुरुस्ती, मोटार ड्रायव्हींग, मराठी /इंग्रजी टायपिंग, इमिटेशन ज्वेलरी मेकींग, लघुलेखन, सेल्स गर्ल, विमा एजंट, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, घनकचरा प्रशिक्षण व बायोगॅस (कचऱ्यापासून खत निर्मीती, गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व

व्यवस्थापन), रोपवाटीका तसेच शोभिवंत फुडझाडांची व औषधी वनस्पतींची लागवड व विक्री, इत्यादी प्रशिक्षण स्थानिक पातळीवरील गरज लक्षात घेवून प्रशिक्षण आयोजित करावीत. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रति लाभार्थी रु. ५,०००/- पर्यंत महिला व बाल कल्याण समितीस खर्च करता येईल. प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वत: भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त १ वर्षाचा असावा. तसेच मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्याबरोबरच त्यांना राज्यातील विविध शासकीय / निमशासकीय कार्यालयातील रिक्त पदे व महिलांसाठी आरक्षित ३० % पदे याबाबतची माहिती देण्यात यावी. त्यांना सदर पदांसाठी अर्ज उपलब्ध करुन देणे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी आवश्यक ती फी उपलब्ध करुन देणे. अशा पदांसाठी असलेल्या स्पर्धा परिक्षासाठी प्रशिक्षण देणे व सरावासाठी / अभ्यासासाठी पुस्तके उपलब्ध करुन देण्यासाठी तालुकास्तरावर वाचनालय सुरु करणे. त्याचप्रमाणे या संदर्भात प्रथमत: महिन्यातून एकदा व जास्त प्रतिसाद लाभल्यास पंधरा दिवसातून / आठवड्यातून एकदा जिल्हा स्तरावर / तालुका स्तरावर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात यावे.

२) मुलींना <u>स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी प्रशिक्षण :-</u>

महिला व मुलींवर होणारे अन्याय, त्यांचे होणारे लैंगिक शोषण अश प्रकारच्या अत्याचारांना सक्षमपणे तोंड देता यावे, यासाठी इयत्ता ४ ते १० वी पर्यंतच्या व महाविद्यालयातील मुलींना तसेच शाळेतील इच्छूक महिला शिक्षकांना ज्युडो कराटे, योगाचे सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात यावे. सदर प्रशिक्षण स्थानिक ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या मान्यतेने आयोजित करावे. या योजनेअंतर्गत प्रत्येक प्रशिक्षणार्थीवर जास्तीत जास्त रु. ६००/- (रु. सहाशे फक्त) पर्यंत खर्च करण्यात यावा. या योजनेवर पूर्ण नियंत्रण महिला व बाल कल्याण समितीचे राहील. या प्रशिक्षणासाठी ज्युडो, कराटे व योगाचे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या व जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र असलेल्या प्रशिक्षकाची निवड करण्यात येईल.

३) महिलांसाठी <u>समुपदेशन केंद्र :-</u>

कुटूंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. समुपदेशन केंद्र स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविणेत यावे. यासाठी समुपदेशक व विधी सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करणेत यावा. स्वयंसेवी संस्थेची निवड त्रिसदस्यीस समिती मार्फत करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी हे त्या समितीचे अध्यक्ष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) हे सचिव व समाज कल्याण अधिकारी हे सदस्य असतील.ज्या संस्थेकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनसाठी आवश्यक मनुष्यबळ, आर्थिक क्षमता, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील, अशा संस्थांना प्राधान्य देण्यात यावे. जिल्हा स्तरावरील समुपदेशन केंद्रात एक समुपदेशक व एक विधी सल्लागार कार्यरत असावेत. तालुकास्तरावरील समुपदेशन केंद्रात एक समुपदेशक व एक विधी सल्लागार कार्यरत असावेत. जिल्हा पातळीवरील समुपदेशक व विधी सल्लागार यांना दरमहा प्रत्येकी रु. १२०००/- पर्यंत मानधन देणेत यावे. तालुका पातळीवरील समुपदेशक व विधी सल्लागार यांना दरमहा प्रत्येकी रु. ९०००/- पर्यंत मानधन देणेत यावे.

यापुर्वी जिल्हा स्तरावर व पंचायत स्तरावर कार्यरत असणाऱ्या समुपदेशक व विधी सल्लागार यांना यापुढे वाढीव मानधन देणेत यावे. नव्याने समुपदेशन केंद्र स्थापन करावयाचे झाल्यास वृत्तपत्रात जाहिरात देवून समुपदेशन केंद्र स्थापन करणेत यावे. यासाठी स्वयंसेवी संस्थेची निवड करताना संबंधित संस्थेकडे आवश्यक मनुष्यबळ, आर्थिक क्षमता, जागा व सुविधा असाव्यात. ज्या संस्थेकडे जागा नाही,

त्या संस्थेस जागा जिल्हा परिषद, पंचायत समितीमार्फतही उपलब्ध करून देता येईल. नव्याने समुपदेशन स्थापन करावयाचे झाल्यास राज्य महिला आयोगाची सहमती घ्यावी. समुपदेशन केंद्राशी महिलांना संपर्क साधता यावा, यासाठी जिल्हा परिषद/ पंचायत समितीमार्फत दुरध्वनीची सुविधा उपलब्ध करून द्यावी. दुरध्वनी व इतर कार्यालयीन खर्चासाठी दरमहा जास्तीत जास्त रु. १०००/- इतकी रक्कम खर्च करण्यात येईल. समुपदेशक व विधी सल्लागार यांचे मानधनाची रक्कम संबंधित संस्थेच्या नावे धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

४) इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण :-

शासकिय व निमशासकिय नोकरीसाठी एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण अनिवार्य आहे. संगणकाबाबतचे ज्ञान, कौशल्य प्राप्त करण्यासाठी इयत्ता ७ वी व १२ वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी., सी. सी. सी. व समकक्ष असणारे प्रशिक्षण देणेसाठी सदरहू योजना उपयुक्त राहील.एमएससीआयटी प्रशिक्षण हा कार्यक्रम महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई (एम.के.सी.एल.) यांचेकडे हस्तांतरीत केलेला असल्याने या महामंडळाचे अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजित करावे. या परिक्षेचे फॉर्म ऑनलाईन भरावे लागत असुन परिक्षा व प्रशिक्षण शुल्क फी आगाऊ भरावी लागते, त्यामुळे प्रशिक्षण संस्थांना आगाऊ रक्कम अदा करून प्रशिक्षण पुर्ण करता येईल. परिक्षा व प्रशिक्षण फी यामध्ये वारंवार होणारे बदलाप्रमाणे ही रक्कम निश्चित करावी. या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुटुंब तसेच ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ५०,०००/- पर्यंत असलेल्या कुटुंबातील मुलींना प्राधान्याने देण्यात यावा.

५) तालुकास्तरावर शिकणाऱ्या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-

ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ ते १० तसेच महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींना शिक्षण घेणाऱ्या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वत:च्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा किंवा महाविद्यालय असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. या योजनेखाली वसतीगृह इमारतीचे बांधकाम न करता, भाडयावर इमारत / घर / फ्लॅट घेण्यात यावेत.सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. त्याशिवाय लाभार्थीकडून कोणतीही फी घेऊ नये. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा महिला व बाल कल्याण समितीने निश्चित करावी. तथापी प्रति लाभार्थी प्रति माह रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) पेक्षा (भाडे वगळून) जास्त असणार नाही.

६) किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर, आरोग्य, कुटुंबनियोजन, कायदेविषयक प्रशिक्षण :-

शाळा व महाविद्यालयातील किशोरवयीन मुलींचा विकास व सक्षमीकरण व्हावे , पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारावा, त्याचप्रमाणे स्वच्छता, प्रजनन व लैंगिक आरोग्य, कुटूंब व बालकांची काळजी घेणे याविषयी किशोरींमध्ये जाणीव व जागृती निर्माण व्हावी, जीवनकौशल्ये, गृहकौशल्ये व व्यवसाय कौशल्ये, याबाबत किशोरींना मार्गदर्शन मिळावे, किशोरवयीन मुलींमध्ये आत्मविश्वास वाढावा, किशोरवयीन मुलींना विविध कायदेविषयक तरतुदींची माहिती मिळावी, म्हणुन प्रतिवर्षी अंगणवाडी पर्यवेक्षिका, विधी तज्ञ, अनुभवी व संवेदनशील तज्ञ मार्गदर्शक यांचेमार्फत प्रशिक्षण शाळा आयोजित कराव्यात. यासाठी या तज्ञ मार्गदर्शकांना रु. २००/- ते ५००/- पर्यंत मानधन देणेत यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. माता सक्षमीकरण, गरोदर माता, किशोरवयीन मुलींना लसीकरण, माता समिती बैठका व आहार विषयक मार्गदर्शन असे कार्यक्रम आयोजित करावेत. यासाठी खर्चाची मर्यादा महिला व बाल विकास समिती यांनी निश्चित करावी.

७) <u>अंगणवाड्यांसाठी स्वतंत्र इमारत/भाडे :-</u>

एकात्मिक बाल विकास विभागामार्फत मंजूर केलेल्या अंगणवाडींची संख्या मोठया प्रमाणात आहे. बऱ्याच अंगणवाडया उघडयावर, देवालय, समाजमंदीर, खाजगी इमारतीत जागा भाडेपट्टयाने घेऊन भरविण्यात येतात. ज्या ठिकाणी अंगणवाडयांना स्वतंत्र इमारत नाही, अशा ठिकाणी नविन अंगणवाडी इमारत बांधकामासाठी रक्कम रुपये ४.५० लक्ष पर्यंत निधीची तरतुद करणेत यावी. महिला व बाल कल्याण विभागाने अंगणवाडी इमारत बांधकामामध्ये वाढ केल्यास, त्याप्रमाणे महिला व बाल विकास समितीस अंगणवाडी इमारत बांधकाम खर्चात वाढ करता येईल. जेथे अंगणवाड्यांसाठी जागा भाड्याने घेतलेल्या आहेत, अशा जागांचें भाडेमूल्य सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निश्चित केलेल्या दरानुसार अदा करता येईल.

८) <u>बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, यांना पुरस्कार देणे:-</u>

बालवाडी व अंगणवाडीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांना आदर्श पुरस्कार देता येईल. या योजनेसाठी वार्षिक रु. ३.०० लक्ष पर्यंत खर्च करता येईल.

९) <u>पंचायत महिला शक्ती अभियान अंतर्गत पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिर्धींना प्रशिक्षण व महिला मेळावे व मार्गदर्शन केंद्र :-</u>

पंचायत संस्थांमध्ये महिलांना ५०% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने त्यांची क्षमताबांधणी होणे आवश्यक आहे. पंचायत महिला शक्ती अभियान अंतर्गत पंचायत राज संस्थामधील तिन्ही स्तरातील महिला लोकप्रतिनिर्धींना प्रशिक्षण मिळावे यासाठी जिल्हा परिषदेतील महिला व बाल विकास विभागात मार्गदर्शन केंद्र स्थापन करणेत यावे. या मार्गदर्शन केंद्रात एक एम.एस.डब्ल्यु. चे संगणक कौशल्य असलेल्या मार्गदर्शकाची कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुक करावी. यासाठी अर्ज मागणी करून मुलाखतीद्वारे त्रिसदस्यीय समितीमार्फत निवड करावी. या समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे अध्यक्ष, उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) हे सचिव व समाजकल्याण अधिकारी हे सदस्य असतील. या मार्गदर्शकाचे मानधन दरमहा रुपये १५,०००/- पर्यंत असावे. या केंद्रात दूरध्वनीची सुविधा असावी व त्यासाठी खर्चाची तरतूद करावी. या केंद्रामार्फत महिला सदस्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. (उदा. क्रांतीज्योती धर्तीवरील प्रशिक्षण) तसेच महिला प्रतिनिर्धींसाठी प्रशिक्षण व महिला मेळावे आयोजित करावे. यासाठी वार्षिक रु. १०.०० लक्ष पर्यंत तरतुद करता येईल.

<u>१०) बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण :-</u>

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षणासाठी तरतुद करणेत यावी. यासाठी किती तरतुद असावी, याबाबत महिला व बाल कल्याण समितीने निर्णय घ्यावा.

११) <u>विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार :-</u>

राज्यस्तरावर क्रिडा, कला, शिक्षण अशा विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार करण्यात यावा. यासाठी निधीची तरतूद करावी. पुरस्काराचे स्वरुप महिला व बाल कल्याण समितीने ठरवावे. तसेच आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकातील (BPL) विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार करण्यात यावा व त्यांना १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक मदत करण्यात यावी. याबाबतची रक्कम महिला व बाल कल्याण समितीने निश्चित करावी.

१२) महिला व बालकल्याण समिती सदस्यांचा दौरा :-

समितीस स्वत:च्या निधीमधून ग्रामपंचायत, पंचायत समिती, व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींचे पंचायत राज, आदर्श गाव, निर्मल ग्राम, महिला बळकटीकरण, महिला व विकासाचे उपक्रम इ. विषयांची माहिती घेण्यासाठी अभ्यास सहलीचे राज्यांतर्गत आयोजन करावे. महिला लोकप्रतिनिधींना नाविन्यपूर्ण योजनांची माहिती घेण्यासाठी राज्याबाहेरील दौऱ्याचे आयोजन करता येईल. राज्यांतर्गत व राज्याबाहेर अशा सहलींसाठी प्रतिवर्ष जास्तीत जास्त रु. ५.०० लक्ष पर्यंत खर्च मर्यादा विहित करण्यात येत आहे.

गट "ब" च्या योजना (वस्तु खरेदीच्या योजना)

१३) अंगणवाडींना विविध साहित्य पुरविणे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेखालील अंगणवाड्यांना एकात्मिक बाल विकास सेवेकडून विविध साहित्य पुरविण्यात येते. मात्र हे साहित्य अपूरे पडते त्यामुळे या अंगणवाडीतील, मिनी अंगणवाडीतील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी साहित्याची आवश्यकता असल्यास यावरील खर्च जिल्हा परिषदेने स्वत:च्या/ शासन निधीतून करावा. सदर साहित्यामध्ये शैक्षणिक व बौध्दीक विकासाला चालना देणारी विविध प्रकारची खेळणी, शारिरिक विकासासाठी आवश्यक खेळाचे साहित्य, शैक्षणिक तक्ते, चाईल्ड ट्रेकिंग सॉफटवेअर, प्रौढ वजनकाटे, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, इन्फेंटोमीटर, स्टेडीओमीटर, जलशुध्दीकरण यंत्रे, टेबल खुर्ची, कपाटे, चप्पल स्टँड, स्टील डिशेस, चमचे, ग्लास, सतरंजी, बस्करपट्टी, डिजिटल टिव्ही, संगणक, अंगणवाडीतील मुला/मुलींना गणवेश वाटप इ. साहित्य पुरविण्यात येईल. अंगणवाड्यांना विज कनेक्शन, नळ कनेक्शन ग्रामंपचायतीमार्फत पुरविण्यात यावे.

१४) कुपोषित मुलांमुलींसाठी व किशोरवयीन मुलींसाठी, गरोदर, स्तनदा माता यांना अतिरिक्त आहार :-

ग्रामीण भागातील अंगणवाडीचे कार्यक्षेत्रातील ६ महिने ते ३ वर्ष व ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील मुलामुलींना अंगणवाडीमार्फत आहार दिला जातो. या व्यतिरिक्त कुपोषित मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी विशेष आहार म्हणून प्रोटीन सिरप, प्रोटीन पावडर, मायक्रोन्युट्रीयंन्ट सप्लीमेंटेशन सिरपचा, मिनरल व्हिटॅमिन्सचा पुरवठा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार दुध, सोयादुध,चिक्की, लाडू, अंडी, फळे, गुळ शेंगदाणे इत्यादी पौष्टीक व प्रथिनयुक्त आहार तसेच गर्भवती , स्तनदा माता व किशोरी मुलींसाठी लोहयुक्त गोळया देणेत याव्यात. किशोरवयीन म्हणजेच १३ ते १९ वयोगटातील दारिद्रय रेषेखालील शालेय व शाळाबाह्य मुलींना आवश्यक अशा आरोग्यविषयक साहित्याचे मोफत वाटप करण्यात यावे. (उदा. सॅनिटरी नॅपकीन इ.)

उपरोक्त साहित्याचा पुरवठा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत होत असल्यास या योजनेमधून सदर साहित्याचा पुरवठा करण्यात येऊ नये.

१५) दुर्धर आजारी मुलांचे शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य :-

ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे अशा कुटुंबातील ० ते ६ वयोगटातील मुलामुलींच्या ह्रदय शस्त्रक्रिया, ह्रदय उपमार्ग शस्त्रक्रिया, अस्थिव्यंग असणाऱ्या, क्लेप पॅलेट, सेरेब्रलपाल्सी, कर्करोग, किडणीतील दोष अशा गंभीर शस्त्रक्रिया करणेसाठी, त्या कुटुंबाला आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून प्राथमिक तपासणीसाठी रु. १५,०००/- पर्यंत व ऑपरेशन झाल्यानंतर रु. ३५०००/- पर्यंत किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी कमी असेल ती रक्कम अर्थसहाय्य देता येईल. ज्या कुटुंबांनी अशा प्रकारच्या गंभीर शस्त्रक्रिया हॉस्पीटलमध्ये

करुन घेतलेल्या आहेत, त्यांच्या कागदपत्रांची शहानिशा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून करुन घेण्यात येईल.

१६)महिलांना विविध साहित्य पुरविणे :-

